# महाभारत

## खंड१२ : वनपर्व ४

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## खंड बारावा

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्याप्पू र्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जानेवारी २०१९**

# – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसापेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा तेरावा खंड आपण आता वाचणार अहात, त्यात जटासूर वध, यक्ष युद्ध, निवात कवच (दानव) युद्ध आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील  गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

ह्या खंडात जटासूर वध, यक्ष युद्ध, निवात कवच (दानव) युद्ध तुम्ही पहाणार अहात.

## जटासूर वध पर्व सुरू

### (भाग पहिला)

वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुनाच्या येण्याची प्रतिक्षा करत ते पांडव व त्यांच्या बरोबर इतर यात्री त्या अप्रतिम अशा बद्रीच्या नर नारायणाच्या आश्रमात राहू लागतात. त्यांना तेथवर आणून पोहोचवणारे घटोत्काचाचे मित्र राक्षस नंतर आपापल्या ठिकाणी निघून जातात. एके दिवशी, जेव्हां भिमसेन कोठेतरी बाहेर गेला होता, एक राक्षस युधिष्ठीर, द्रौपदी, नकुल व सहदेव अशा सगळ्यांना घेऊन पळून जातो. तो राक्षस बराच काळ ह्यांच्या यात्रींबरोबर एका उच्च कुलिन ब्राह्मणाचे सोंग घेऊन फिरत होता. सर्व शास्त्र आणि तर्क ह्यात अव्वल असल्याची बतावणी करून भोळसट युधिष्ठीराला फसवून तो त्यांच्यात फिरत होता. त्याचा अंतस्थ उद्देश होता, पांडवांची शस्त्रे पळवून नेण्याचा. त्याशिवाय द्रौपदीचे हरण करून पांडवांची खोड मोडण्याचासुद्धा त्याचा इरादा होता. त्या असुराचे नांव होते जटासुर. भोळसट युधिष्ठीर त्याच्या बतावण्यात विश्वास ठेवून त्याला बरोबर येण्याचे आमंत्रण देतो. अस्तनीतील निखार्यासारखा तो होता. त्या दिवशी वृकोदर शिकार करण्यासाठी गेला आहे असें पाहून जटासुर चांगला डाव साधतो. घटोत्कच व त्याचे राक्षस मित्र सुद्धा इतरत्र गेले आहेत आणि ऋषी लोमस स्नानासाठी नदीवर गेले आहेत, ते पाहून तो पांडवांची सगळी आयुधं गोळा करतो आणि जटासुर अजस्त्र रुप धारण करून द्रौपदी व तिघा पांडवांना उचलून पळून जातो. त्यावेळी सहदेव स्वताला त्याच्या तावडीतून कसाबसा सोडवून घेतो आणि त्याच्या कडून कौशिक नांवाची तलवार खेचून काढतो. त्यानंतर तो भिमासा हांका मारू लागतो. युधिष्ठीर राक्षसाला समजावण्याचा प्रयत्न करतो, तो त्याला सांगतो किं, हे त्याचे कृत्य त्याच्याच अंगलटीला येणार आहे, त्यात त्याचा मृत्यू ओढवू शकतो. युधिष्ठीर त्याला नितीशास्त्रातील नियम सांगत रहातो ज्याची त्या राक्षसाला कांहींच किंमत नव्हती. युधिष्ठीर त्याला सांगतो, "अरे राक्षसा, तुला नितीमुल्यांचे कांहीं समजते कां"? नितीमुल्ये सगळ्यांना सारखीच लागू असतात, ती मुल्ये केवळ माणसानाच लागू असतात असें नाही. ती राक्षसांना सुद्धा तितकीच लागू होतात. येथे नैतिक मुल्यांचा विचार अशासाठी करावयाचा कीं, तू आमच्या यात्रेकरूत सामील

होऊन आमचा पाहूणचार घेऊन येथवर आला आहेस. त्याचे पाण अशारितीने फेडत नाहीत. आम्ही राजे देवाचे प्रतिनिधी असतो व म्हणून एका राजाला व त्याच्या पत्नीस अशारितीने पळवून नेणे कोणत्याही शिष्टाचारात बसत नाही. अशा वागण्यामुळें देवसुद्धा अडचणात येतात. नितीमुल्यांच्या पालनामुळें देवांचेसुद्धा भले झाले आहे. जर राजाच सुरक्षित नसेल तर इतरांचे काय होणार? असें होत गेले तर समृद्धी कशी होणार"? आमचा गुन्हा कोणता म्हणून तू असा आमच्याशी वागत आहेस? अरे नरभक्षक आम्ही देवांची सेवा करतो, आम्ही कोणापुढे मान खाली करत नाही. ज्यांने तुला आधार दिला, तुला खायला घातले, अशांना इजा करणे शिष्टाचाराच्या नियमांत बसत नाही हे तुला समजत नाही कां? आम्हाला अशाप्रकारे पळवून नेण्याचे तू कसे समर्थन करशिल? एक ब्राह्मण म्हणून तू मानमरातब मिळवलास असें झाले तरी तू असें कसें करतोस. हा विश्वासघात ठरतो व त्याबद्दल तुला नंतरच्या जगात सजा होईल ह्याचा तू विचार कां करत नाहीस"? तुझ्या अशा कृत्यामुळें तू मरणेच सगळ्यांसाठी श्रेयस्कर आहे. तुझ्या ह्या वर्तणूकीचे कोणत्याही प्रकारे समर्थन होत नाही. आमची आयुध आम्हाला परत कर आणि द्रौपदीला स्पर्श करू नकोस. तसें केलेस तर तुला मोठे पाप लागेल ह्याचा विचार कर. ते सगळे बडबडणे व्यर्थ होते. जटासुर त्याच्या वेगांने दूर जातच होता. आपल्या बोलण्याचा कांहींच परिणाम होत नाही हे लक्षात आल्यावर युधिष्ठीराने त्याचे वजन वाढवण्यास सुरुवात केली. त्याचा पळून जाण्याचा वेग त्या दाबामुळें कमी झाला. सहदेव भिमाच्या शोधात त्या दिशेने जात होता. युधिष्ठीर बाकीच्या तिघांना बोलतो, ह्या राक्षसाची भिती बाळगू नका, मी त्याचा पळून जाण्याचा वेग कमी केला आहे. आपला भाऊ वायुपुत्र जवळच असेल तो आपल्याला सोडवण्यासाठी तेव्हढ्यात येईलच. तेव्हढ्यात सहदेव भिमाला काय झाले ते सांगतो. युधिष्ठीर भिमाला सांगतो, "ह्या मूर्ख राक्षसाचे डोके फिरले आहे, त्याच्या अशा कृत्यामुळें, ह्या तीर्थयात्रेत जे पुण्य त्यांने मिळवले आहे ते सगळे त्याने घालवले आहे. क्षत्रियाने लढून त्याचे श्रेय मिळवायचे असते. लढाईत एक तर तो राक्षस तुला मारेल अथवा तू त्याला मारशिल. अरे भिमा, आता तुला तुझे सामर्थ्य दाखवावयाचे आहे. जर तू त्याला मारलेस तर तू स्वर्गात जाशिल. जर तो आजच्या सुर्यास्तापर्यंत जीवंत राहीला तर ती तुझ्यासाठी नामुश्की ठरेल". सहदेव त्या राक्षसाला आव्हान देतो व सांगतो, लढून तू द्रौपदीला घेऊन

जा मला मारल्यावरच ते तुला शक्य होईल. तुला असें जाऊ देणार नाही. तेव्हढ्यात तेथे भिम येतो. त्याच्या हातात त्याची गदा असते. जसे इंद्राने त्याचे वज्र धरावे तसे ते दिसत होते. तो पहातो कीं, त्याचे दोन भाऊ बांधलेल्या अवस्थेत आणि त्याची पत्नीसुद्धा जटासुराच्या खांद्यावर बसलेली. भिमाला पाहून तो राक्षस घाबरलेला दिसला. त्याची बुद्धी भ्रष्ट झालेली होती. तो इकडे तिकडे असें भटकू लागला. ते दृष्य पाहिल्यावर भिमाचे पित्त खवळले. त्याला संताप अनावर झाला. भिम त्याला बोलतो, जर आम्हाला तुझ्या उद्देशांची अंदाज आधी आला असता तर तुला तेव्हांच ठार मारले असते. आमच्या आयुधाने तू कांहींही करू शकणार नाहीस कारण त्यासाठी जे मंत्र सामर्थ्य लागते ते तुझ्याकडे नाही. तरी ती सगळी आयुध तू बर्या बोलाने खाली ठेव. तू आम्हाला जरासुद्धा संशय येऊ दिला नाहीस कारण आम्ही सुद्धा मोठ्या विश्वासाने सगळ्या यात्रेकरूंना वागवत होतो. आता मात्र तुझी गय केली जाणार नाही. ब्राह्मणाच्या वेषात असें कृत्य करतांना तुला भिती कशी वाटली नाही. युधिष्ठीर सांगतो भिमाला अशा राक्षसाला ठार मारणे हेंच योग्य होईल. आज तुझे दिवस भरले आहेत. भिम राक्षसाला बोलतो, तू तुझ्या मित्रांकडे वक आणि हिडींब ह्याच्याकडे यमाच्या घरी जाणार हे निश्चित. ते ऐकल्यावर जटासुर नकुल व द्रौपदी ह्यांना खाली ठेवतो व भिमाशी दोन हात करण्यासाठी तयार होतो. राक्षस त्याला दात ओठ चावत बोलतो, मी तुझ्याशी लढण्यास घाबरत नाही. आज मी तुझ्या रक्ताचे अर्घ्य त्या राक्षसांना देईन ज्यांना तू ठार मारले आहेस. ते त्या राक्षसाचे उद्‌गार ऐकल्यावर आणखीनच रागात भिम त्याच्यावर चाल करून जातो. जगाच्या अंताच्या समई जसे व्हावे तसे झाले. त्यांच्यात तुंबळ द्वंद्व सुरु झाले. दोघेही दात ओठ चावत एकमेकांवर तुटून पडले होते. जसा वली इंद्रावर तुटून पडला तसा जटासुर भिमावर धावून गेला. त्याचवेळी माद्रीची दोनही मुलं त्यात सामिल झाली. परंतु, भिमाने त्यांना बाजूला होण्यास सांगितले स्मित करत. तो बोलतो, "मी ऐकटा पुरेसा आहे ह्या बदमाषासाठी". त्यानंतर त्यांचे द्वंद्व जोरात सुरु झाले. ते असें युद्ध होते जसे देव आणि दानव ह्यांचे आहे. त्यांच्या त्या द्वंद्वात आजूबाजूची झाडे मोडून तोडून गेली. ते एकमेकांना ठार मारण्याचे तयारीने लढत होते. त्या द्वंद्वाची तुलना वली आणि सुग्रीवाच्या लढाईशी करता येईल अशी होती. ते सुद्धा एका स्त्रीसाठी लढत होते जसे हे लढत होते. प्रथम फेकाफेकी झाल्यावर तो दोघे एकमेकांना

भिडले. जसें दोन हत्ती लढतांना भिडतात. थोडावेळ ते झाल्यावर भिमांने जटासुराच्या मानेवर जोरात फटका मारला. त्यामुळें तो राक्षस बेहोष झाला. भिमाने त्याची गर्दन पिरघळण्यास सुरुवात केली. त्यामुळें त्याची मान तुटली. त्याचे शिर धडापासून वेगळे झाले. त्याचे सगळे हात पाय भिमांने त्याच्या लाथेने तुडवून त्यांचा चेंदामेंदा केला. झाडावरून त्याचे फळ खालती पडावे असें त्या राक्षसाचे डोके जमिनीवर पडलेले होते. ते युद्ध सगळे ब्राह्मण पहात होते. जटासुर मेल्याने त्या सगळ्यांना संतोष होतो. ते सगळे भिमाची स्तुती करणारी कवनं गाऊ लागतात. ते असें होते जसें मरुतांनी वसवाची स्तुती केली होती.

अशारितीने जटासुर वध पर्व संपले.

# यक्ष युद्ध पर्व सुरू

## (भाग दुसरा)

वैशंपायन पुढे सांगतात, त्या जटासुराचा वध केल्यानंतर ते पांडव पुन्हा नर नारायणाच्या बद्री आश्रमात जाऊन राहू लागले. एके दिवशी युधिष्ठीराला अर्जुनाची आठवण येते व तो त्याच्या भावंडांना व पत्नीला बोलावतो व सांगतो, "आपण गेली चार वर्षे वनांत भटकत मजेत घालवली आहेत. तुम्हाला आठवत असेल किं, विभत्सु बोलला होता कीं, तो पांच वर्षांनी ह्या स्वेताच्या पर्वतावर आपल्याला येऊन मिळेल, जेथे सदैव प्रसन्न वातावरण असते, पक्षी गात असतात, झाडांवर फळं व फुलं भरलेली असतात. जेथे मोठे हिंस्र पशु जसे वाघ, सिंह, अस्वलं, गवे वावरत असतात. त्याशिवाय जेथे हरणं, सांबरं सुद्धा खेळत असतात. जेथील तलावांत पवित्र कमळं नेहमी डोलत असतात. ज्यांच्या पाकळ्यांची मोजदाद करणे केवळ अशक्य असते. तेथे दैवी राक्षस नेहमी जात असतात. आपला सामर्थ्यवान भाऊ मला म्हणाला होता, तो पांच वर्षे त्या आयुधांच्या साधनेसाठी स्वर्गात राहील. आता त्याची येण्याची वेळ समीप आली आहे म्हणून मी त्याला भेटण्यासाठी उताविळ आहे". ते बोलल्यानंतर युधिष्ठीर ब्राह्मणांना बोलावतो. त्यांना अर्जुनाच्या येण्याबद्दल सांगतो, ते ब्राह्मण त्यावर अनुमोदन देतात. म्हणतात, सगळे चांगले होईल. त्यामुळें आनंद पसरेल. ते बोलतात, तुम्ही ह्या पृथ्वीवर राज्य कराल. कुलिन क्षत्रियांचे राज्य तुम्ही प्रस्थापित कराल असा आशिर्वाद ते देतात. त्यानंतर तो पांडव त्याच्या भावंडाबरोबर आणि द्रौपदीसह निघतो स्वेताच्या शिखराकडे. तो प्रवास सोपा नव्हता. त्याच्या बरोबर मोजके ब्राह्मण होते. बराच प्रवास पायी व जेथे शक्य नव्हते तेथे मित्र राक्षसांच्या पाठीवर बसून ते जात होते. त्यांच्या पुढे दैवी सामर्थ्य असलेले लोमस ऋषी जात होते. वाटेत ते जंगले, दर्या, कपारी, झरे असे सगळे निसर्गाचे रुप पहात असतात. ते वाघ, हत्ती त्या वनात फिरतांना पहातात. वाटेत ते पर्वत मैनक पहातात. त्यानंतर गंधमादन पर्वताचा पायथ्याचा प्रदेश ते पहातात. त्यापुढे ते स्वेताचे शिखर पहातात. त्याच्या बाजूने वहाणारे झरे ज्याचे पाणी रत्नासारखे चमकत होते ते त्याना दिसतात. सातव्या दिवशी ते त्यांना जावयाचे होते त्या ठिकाणी पोहोचतात. तेथे त्यांना पवित्र

आश्रम दिसू लागतो जेथे असुर वृषपर्व रहात असें. त्या आश्रमाच्या सभोवर दाट झाडी होती, त्याच्या बाजूने एक धबधबा असतो. तेथे ते कांहीं काळ विश्राम करतात. त्यानंतर तो सगळे ऋषी वृषपर्वाला भेटण्यासाठी आश्रमात शिरतात. तेथे त्यांचे स्वागत होते. त्याच्या स्वताच्या मुलांसारखे तो त्यांना वागवतो. त्यामुळें पांडवांना फार आनंद होतो. तेथे ते सात दिवस वृषपर्वाचा पाहूणचार घेतात. आठव्या दिवशी ते त्या थोर ऋषीची परवानगी घेऊन आपल्या पुढील प्रवासासाठी निघतात. पांडवाबरोबर आलेले ब्राह्मण मात्र तेथे वृषपर्वाकिडेच रहातात. तेथे पांडव त्याचे सामानसुद्धा ठेवतात त्यात त्यांच्या नित्य यज्ञाची भांडी, यज्ञाच्यावेळी नेसावयाचे अंगरखे, त्यांचे नित्य नेसावयाचे दागिने असे सगळे असते. तो वृषपर्व जो सगळे जाणतो तो पांडवांना कांहीं जरूरी सुचना करतो जसे त्यांने त्याच्या स्वताच्या मुलांना दिल्या असत्या. ज्या त्याना पुढच्या प्रवासात उपयोगी येणार असतात. वृषपर्वाची सम्मती घेऊन ते उत्तरेकडे निघाले. त्यांना निरोप देण्यासाठी वृषपर्व स्वतः चालत त्याच्या सीमेपर्यंत गेला. निरोपाचे मार्गदर्शन करून वृषपर्व आपल्या आश्रमात परतले. त्या डोंगराळ प्रदेशासून ते सगळे पायी चालत जाऊ लागले. त्या भागात मोठ्या हिंस्त्र श्वापदांचा संचार होता. दाटीवाटीने झाडे वाढलेली होती. अशा प्रकारे चालत ते सगळे स्वेताच्या पायथ्याशी पोहोचतात. त्या पर्वताच्या जमिनीवर सोन्याचे दगड आणि रत्नाचे खडे कचर्यासारखे विखूरलेले होते. वृषपर्वाच्या सांगण्यानुसार ते त्याच्या ठरलेल्या जागी पोहोचतात. त्याच्या चौफेर निसर्गाची कमाल दिसत होती. सभोवार पसरलेले पहाड जणू त्यांच्याकडे पहात आहेत असें द्रौपदीला वाटत होते. वाटेत अगणित दर्या, कपारी, गुहा, मोठे खडक अशांना पार करत ते जात होते. तो सगळा प्रवास ते चालत करत होते पण कोणाही थकले नाही. ते भाग्यवंत त्या पवित्र डोंगरापाशी जातात तेथे पक्षांचा किलबिलाट चालू होता. त्या भागात विस्तीर्ण वनप्रदेश पसरलेला होता. अनेक तलाव टाक्या होत्या त्यात कमळं तरत होती. तो सगळा आसमंत विलक्षण विलोभनीय होता. आता ते गंधमादन पर्वत जवळून पाहू शकत होते. त्यावर किंपुरुषांची (यक्षांचा एक प्रकार) वस्ती होती. त्या ठिकाणी सिद्ध, साध्य, चरण, विद्याधर, किन्नरं तेथे रहात होते. तेथे भलेमोठे हत्ती त्यांच्या सोंडी हलवत माना डोलवत फिरत होते. सरभांच्या झुंडी इकडून तिकडे अशा धावत खेळत होत्या. अखेरीस तो पंडुचे मुलगे गंधमादन पर्वताच्या अरण्यात

शिरतात. ते कुबेराच्या नंदनवनासारखे सुंदर होते. ते सगळे पांडव त्यांच्या ब्राह्मण सोबत्या बरोबर व द्रौपदी सह तेथे चालत असतांना त्यांना पक्षांच्या सुमधून गाण्याचा अनुभव येतो. तेथील वृक्ष फळाफुलांनी भरलेली होती. त्यांत आंबा, सफरचंद, डाळिंब, संत्री, मोसंबी, फणस, कर्दळी, चंपक, कदंब, बिल्व, बोरं, द्राक्ष, औदुंबर, वड, पिंपळ, अश्वत्थ, खजूर, खिर्क, आवळे, बिभितक, करमर्द, तिंडुक ज्याची फळ फार मोठी असतात अशा फळांची विशेष भर होती. ते त्या गंधमादनाच्या उतारावर दाटीवाटीने वाढलेले होते. त्या झाडावरील फळं रसाळ होती. त्याशिवाय चंपक, अशोक, केतकी, बकुळी, पुंग, सप्तपर्णी, कर्णिकर, कुतीस, मंदार, कमळ, पारिजातक, कुविदर, देवदारू, सालस, माड, तमल, शाल्मली, किंसूक, सिंगसप वगैरे वृक्ष होते व त्यावर घरटी करून चकोर, सुतार, चरक, चेतक इत्यादी पक्षी रहात होती. वाटेच्या दुतर्फा तलाव दिसत होते. त्यात पाणपक्षी त्यांच्या थव्याने बागडत होते. त्या पाणपक्षात कुमुद, पुंडरीक, कोकंद, उत्पल, कल्हर, कमल हे विशेष दिसत होते. त्या शिवाय बगळे, करकोचे, विविध रंगाची बदकं होती. ते पहात होते त्या तलावातील कमळांवर मधमाशां घोंगावत होत्या. पाणकोंबड्या त्यांच्या पिलांबरोबर फिरताना दिसत होत्या. कोणाला कसलेही भय वाटत नव्हते. मोर बेभान होऊन त्याचा पिसारा पसरवून नाचत होते. त्यांचे केकावणे कानाला आनंद देत होते. त्या दाट वनराईमध्ये कित्येक मोर व त्याच्या लांडोर जणू लपंडाव खेळत होते. कित्येक झाडावरील फुलं वेगवेगळे रंग व आकारांनी त्या वनश्रीची शोभा वाढवत होते. तेथील आंब्यावर जो बहर आला होता त्यावर मधमाशा घोंगावत होत्या. त्या उतारावर सोनेरी रंगाची फुलं असलेले बरेच वृक्ष होते. तेथील कांही तलावांत राजहंस शुभ्र व काळ्या वर्णाचे स्वच्छंदपणे फिरत होते. ते निसर्गाचे सौंदर्य पहात ते यात्री चालत होते, त्यामुळें त्यांचा विरंगुळा होत होता. कांहीं ठिकाणी ते थांबत व विश्रांती घेत. तेथील नितळ पारदर्शक पाण्याची चव घेत ते पुढे जात होते. एका वनातून दुसर्या वनात असा त्यांचा प्रवास होत होता त्याचे काय वर्णन करावे. असा प्रवास करत ते यात्री त्या अरण्यात आणखीन आत शिरत होते. ते प्रसन्न करणारे वातावरण पाहून युधिष्ठीर भिमाला बोलतो, "येथे असा एकसुद्धा वृक्ष नाही ज्याच्यावर फुल व फळं नाहीत. ते पहा त्या सरोवरात कमळं कशी फुललेली आहेत, ती पहा, त्या सरोवरातील कमळं, जणूकाय पर्वताला त्यांची माला

घातली आहे. ह्या वनातील झाडांतून मनाला आल्हाद देणारे सुगंध येत आहेत. जणू साक्षात स्वर्ग येथे उतरला आहे. हा स्वर्गाचाच एक हिस्सा आहे. मला असें वाटते येथे आल्याने आपण विशेष दर्जाचे मनुष्य झालो आहोत. येथे फक्त आनंद आढळतो, भय, चिंता येथील कोणालाही स्पर्श करत नाही. त्या पक्षांचे किलबिलाट ऐकून किती समाधान मिळते नाही कां! असंख्य जिवजीका पक्षी त्यांचे एकत्रपणे गाणे गात आहेत त्याचे सूर एकमेकात कसे मिळून गेले आहेत बघ. ते भृंगराज पक्षी पहा, ते उपचक्र पक्षी पहा, त्या सगळ्यांनी जणू गाण्याची चढाओढ लावली आहे असें वाटते नाहीं कां"? गंधमादनाच्या मातीतील खनिजांचे काय वर्णावे? कांहीं रक्त वर्णी, कांहीं पिवळी, कांहीं निळे असें कितीतरी रंग त्या मातीत होते. सूर्याच्या प्रकाशात ते असें चमकत होते. त्यामुळें त्या परिसराचे सौंदर्य खुलून दिसत होते. युधिष्ठीर भिमाला बोलतो, "अरे पार्थ, वृषपर्वांच्या सांगण्याप्रमाणे येथून पुढे गंधर्व आणि किंपुरुष त्यांच्या प्रियसींसह जोडीने फिरत असतात. ते फक्त ह्या डोंगराच्या शिखरावर दिसतात. येथे वेदाची गाणी व इतर सुमधूर गाणी ऐकावयाला मिळतात असें सांगतात. तेथे असलेल्या स्वर्गातील महागंगेच्या पात्रात राजहंस दिसतात. त्याच्या बद्दल सिद्ध व किन्नर विशेष रुची दाखवतात हे मी ऐकले आहे. आता आपण त्यांना पाहू शकतो म्हणजे आपला दर्जा सामन्य माणसांपेक्षा खचितच उंचावला आहे. त्या पहा अप्सरा, किन्नर आणि गंधर्व आपण पाहू शकतो, त्याशिवाय ते बहूफणे असलेले नाग आपण पाहू शकतो".

वैशंपायन पुढे सांगतात, अशारितीने त्यांना जेव्हां लक्षात येते किं, त्यांचा दर्जा माणसापेक्षा उच्च झाला आहे, त्या सगळ्या पांडवांना, द्रौपदीला व त्यांच्या सोबतीत असलेल्या ब्राह्मणांना एक वेगळा हर्ष होतो. ते पुढे चालत असतात, त्याना आता ऋषी अर्ष्टीसेनाचा आश्रम दिसतो. त्याभोवती खुप झाडे होती. ते त्या तपस्व्याच्या आश्रमात प्रवेश करतात. ते पहातात अर्ष्टीसेन अस्थीपंजर अवस्थेत तेथे ध्यान करत होते. त्यांच्या हाडांवर फक्त स्नायू दिसत होते. मेद अजिबात नव्हता.

अशारिताने यक्ष युद्ध पर्वातील दुसरा भाग संपला.

# यक्ष युद्ध पर्व

## (भाग तिसरा )

वैशंपायन पुढे सांगतात, अर्ष्टीसेनाच्या समोर ते उभे रहातात. ज्याने त्याची सगळी पाप कठोर तपस्येने धुतली होती. युधिष्ठीर त्यांचे नांव सांगून ओळख देतो. वाकून वंदन करतो. त्यानंतर कृष्णा नंतर भिम त्यानंतर इतर त्यांना लवून नमस्कार करतात. ते सगळे यात्री त्या ऋषी भोवती घेर करून उभे असतात. त्यांचे पुरोहित धौम्य सुद्धा त्यांची ओळख देतात त्या तपस्व्याला. तो तपस्वी त्याच्या दिव्य दृष्टीने त्यांना आधीपासून जाणत होता. तो ऋषी अर्ष्टीसेन त्यांना बोलतो. "या बसा", ते स्थानापन्न झाल्यावर तो महान तपस्वी त्यांना उद्देशून विचारतो, "आपण असत्याची चांगली बाजू समजण्यात कमी पडत अहात कां"? नंतर तो विचारतो, "तुम्ही पुण्याईचा ठेका घेऊन बसला अहात कां? तुमचे तुमच्या पितरांकडे दुर्लक्ष होत आहे कां? तुमचे वडिलधारे जे वेदातील शिकवण चांगलीच जाणतात तुमच्या बद्दल इतके बेपर्वा कां आहेत? तुम्ही पापाच्या मार्गाचा अवलंब करणार अहात किं नाही? तुम्हाला पुण्यकर्म कसे करावयाचे त्याची योग्य माहिती आहे कां? पापकर्म होण्यापासून कसे स्वताला वाचवावयाचे ते तुम्हाला माहीत आहे कां? तुम्ही स्वताला उच्च समजून इतर पुण्यवंतांकडे दुर्लक्ष करता कां? अरण्यात राहून आपण पुण्याचा मार्ग कसा आचरता अहात? धौम्य तुमच्या अशा वागण्याबद्दल नाराजी कां व्यक्त करत नाहीत? तुमच्या पूर्वजाच्या प्रथांचे तुम्ही यथायोग्य पालन करता कां"? सत्त्वशिलता, व्रतस्थता, वैराग्य (वासनांबद्दलचे औदासिन्य), कर्तव्यपालन, क्षमाशिलता आणि प्रामाणिकपणा हे गुण तुम्ही राजे अहात ह्या करतां योग्य प्रकारे आचरण्यात आहेत कां"? {राजां करतां, हे गुण असणे बंधनकारक होते.} आपण, राजर्षीच्या मार्गाने आपली कर्तव्ये पार पाडतां कां"? वंशात कोणी पुत्र जन्मले कीं, पितर आनंदी किंवा दुःखी होतात कारण ते विचार करत असतात कीं, त्या मुलाच्या पुण्य अथवा पापकर्मामुळें आपल्याला काय भोगावे लागेल त्याचा ते विचार करत असतात. जो पितरांचे, मातेचे, गुरूचे व अग्नीचे  ऋण फेडतो तो जिंकतो त्याच्या कर्तव्यात.

युधिष्ठीर त्याला उत्तर स्वरुप सांगतो, "अहो पुज्य महंत, आपण विचारलेल्या प्रश्नांमुळें मला एक चांगली दृष्टी प्राप्त झाली आहे. त्यामुळें एका राजाची कर्तव्ये कोणती व एका

गृहस्थाची कर्तव्ये कोणती ह्याचा उलगडा झाला आहे. माझ्या जाणीवे नुसार मी माझ्या जबाबदार्या एक राजा म्हणून व एक गृहस्थ म्हणून यथायोग्य रित्या पार पाडत आहे".
अर्ष्टीसेन त्यावर सांगतात, "त्या प्राचीन काळात ऋषी जे फक्त हवा व पाणी ह्यांवर जगत होते, वार्यावर उडत ह्या पर्वतावर आले होते. येथे किंपुरुष त्यांच्या जोडीदारांसह येथे फेरफटका मारतांना तुला दिसतील. त्याचप्रमाणे, कित्येक गंधर्व, अप्सरा, त्यांच्या शुभ्र कटी वस्त्रात तसेंच गळ्यात माळा घालून फिरतांना दिसतील, त्याशिवाय सामर्थ्यवान नाग, सुपर्ण, उरग आणि इतर दिसतील. त्या शिखरातून ताशे, तंबोरा, मृदंग आणि शंखू ह्यांचे आवाज ऐकावयाला येतील. येथून सुद्धा ते ऐकू येतील. येथून कोठेहि जाण्याची इच्छा होणार नाही. अरे भरतकुळी, ह्याच्या पुढे तू जाऊ शकणार नाहीस. मर्त्य लोकांना ह्याच्यापुढे जाता येत नाही. ह्या जागी पर्यंत पाप विचार करणे शक्य असते. पाप विचार केले तर राक्षस धरू शकतात. कैलासा पलिकडे स्वर्ग सुरू होतो. हि पृथ्वीतील दृष्य सृष्टीची मर्यादा आहे. ह्यापुढे अदृष्य सृष्टी सुरू होते ज्यात स्वर्ग आणि पाताळ येतात. जर कोणी ह्या पलिकडे जाण्याचा प्रयास करेल तर राक्षस त्याचा नाश करतात. अरे मुला, त्या प्राचीन काळी माणसाच्या खांद्यावरून जाणारे वैश्रावणाला त्याच्या वैभवात पहात असतं. त्याच्या भोवती फेर धरून नाचणारे गंधर्व आणि अप्सरा त्याला पहावयास मिळत असतं. जेव्हां तो राक्षसांचा, यक्षांचा राजा त्याच्या आसनावर बसलेला दिसे तेव्हां सूर्य पाहिल्या सारखे वाटत असें. ते शिखर देवांचे खेळावयाचे उद्यान आहे. तेथे दानव, सिद्ध, वैश्रावण त्या प्राचीन काळी तंबोरा वाजवून त्याचे मनोरंजन करत असतं. त्या संगीताची सुमधूर धून सगळ्या गंधमादनात ऐकावयाला जात असें. अरे मुलां, युधिष्ठीरा, त्या पर्व काळी (प्राचीन काळ) सगळे जीव हे सगळे पाहू व ऐकू शकत होते. तुमचा भाऊ येथे येईपर्यंत तुम्ही येथे राहू शकता. त्याला माझी हरकत नाही. येथे तुम्हाला मुनी जे खातात ते खाऊन रहावे लागेल. तुम्ही येथे येतांना कांहीं उद्धटपणाचे कृत्य केले नाहींना? येथे रहाण्यामुळें तुला सगळ्या पृथ्वीवर राज्य करण्याचा योग साध्य होणार आहे. तुम्ही तुमच्या लढाईत यशस्वी व्हाल".
अशारितीने यक्ष युद्ध पर्व भाग तिसरा संपला.

# यक्ष युद्ध पर्व
## (भाग चौथा )

जनमेजय वैशंपायनांना विचारतो, "मला सांगा, ऋषी किती काळ माझे पणजोबा त्या गंधमादन पर्वतावर राहिले? तेथे राहून ते शूर योद्धे काय करत होते? आमच्या भिम ह्या पणजोबांनी तेथे हिमालयात कोणता पराक्रम केला ते सांगा. मला ते सगळे ऐकण्याची फार इच्छा आहे. मला वाटते त्याने यक्षांशी लढाई केली नाही. ते वैश्रावणाला भेटले कां? कारण, जसें ऋषी अर्ष्टीसेन म्हणाले होते, तेथे धनाचा देव वैश्रावण येत असतो. मला त्या सगळ्याचा वृतांत समजून घ्यावयाचा आहे. मला अजून पुरेसे समाधान प्राप्त झालेले नाही".

वैशंपायन सांगतात, त्या अतुलनीय योग सामर्थ्य असलेल्या अर्ष्टीसेनाकडून ते त्यांच्या हिताचे ऐकल्यावर त्याप्रमाणे ते शांतपणे त्या आश्रमात राहू लागतात. तेथे जे मुनीजनांचे खाद्य प्राप्त होत होते ते खाऊन ते रहात होते. त्याशिवाय प्रसंगी एकादे वृद्ध हरण जे एरवी सुद्धा मरणार आहे त्याची शिकार करून ते खाण्यात घेत होते. तरुण, गाभण व लहान प्राणी ते मारत नव्हते. त्या त्याच्या वागण्यामुळें यमदेव त्यांच्यावर संतुष्ट होते. त्याशिवाय मध, असा त्याचा सात्त्विक आहार होता. अशा प्रकारे ते पांचवे वर्ष घालवतात. त्यांचा समय जास्त करून लोमसांकडून विविध कथा ऐकण्यात व त्यातून प्रबोधन घेण्यात जात होता. भिमाचा राक्षस पुत्र त्याला आश्वासन देतो कीं, जेव्हां तो त्याचा पिता त्याची आठवण करील तेव्हां तो मदतीसाठी हजर होईल असें सांगून तो त्याच्या सोबती राक्षसांसह निघून गेला होता. ते कृपा दयाळू पांडव अर्ष्टीसेनाच्या आश्रमात असें रहात होते व त्या काळात त्यांनी अनेक चमत्कारीक घटना पाहिल्या होत्या. अशारिताने शांततेत जगत असतांना ते व्रतस्थ मुनी व चरण ह्यांच्या सहवासात होते. त्या काळात युधिष्ठीर त्यांच्या बरोबर वास्तविक प्रश्नांवर चर्चा करत असें. त्या काळात ज्या कांहीं अद्भूत घटना होत होत्या, त्यात एक अशी होती कीं, एक सुपर्ण अचानकपणे एका ताकदवान नागाला उचलून पळवून नेतो. जो एका अवाढव्य सरोवरात रहात होता. अशी घटना झाल्यामुळें तो पर्वत थरथरू लागला. त्या धरणीकंपामुळें झाडे तुटून कोसळू लागली. तो प्रकार सगळे जण, ज्यात

पांडव सुद्धा होते पहात रहातात. पुनः एकदा जोराने वारे वाहू लागले. त्या कडीकपार्यातून जोराने येणार्या वार्यांबरोबर फुलांचा सुगंध येत होता. त्याची फुलं पांच रंगांची होती. त्यामुळें प्रभावित झालेली ती पांडवी (द्रौपदी) बोलली भिमाकडे पहात, "अरे माझ्या भिमा, ह्या फुलांचे पांच रंग किती छान दिसतात. ती फुलं अश्वर्थ नदीत सुपर्ण वाढवतात असें मी ऐकले आहे, तुझ्या भावाने, जो शब्दाचा पक्का आहे, खांडवप्रस्थात ज्याने गंधर्वांना, राक्षसाना चीत केले, इंद्रालासुद्धा घाबरवले आणि गांडीव मिळवले, त्याचा तू मोठा भाऊ आहेस. तू कांहीं कमी नाहीस. तू तुझ्या ताकदीच्या जोरावर राक्षसांना टोकावर नेऊन ठेवले आहेस, मित्रांना संरक्षण देतोस, असा तू मला त्या डोंगरावरील ती सुंदर फुलं आणून देशिल कां"? "माझ्या मनात बरेच दिवस कांही विचार सतत येतात, तू हे पर्वत अशांपासून मुक्त करावेस म्हणजे सगळे जीव सुखाने राहू शकतील". तिचे ते बोलणे भिम मनावर घेतो. पुनः एकदा द्रौपदीने तिच्या त्या बलशाली पतिला मर्दानगी दाखवण्यासाठी उद्युक्त केले होते. तो सर्वगुणी पांडव ज्याच्या ताकदीला मर्यादा नाहीत. आपली शस्त्र घेऊन निघतो. त्याला द्रौपदीला खूष करावयाचे असते. कोणाबद्दल ही दुःस्वास न बाळगता, तो वायुपुत्र डोंगर चढण्यास सुरुवात करतो. तो पहाड फार उंच होता. ज्या वाटेने तो जात होता ती एका माणसास जाण्या इतकी लहान होती. थोड्याच वेळांत तो महाशक्तीमान पुरुष डोंगराच्या टोकावर पोहोचतो. त्याला पाहून तेथे असलेले किन्नर फार आनंदी होतात. तेथे असलेले नांग, सिद्ध, मुनी, गंधर्व आणि राक्षस सगळ्यांना आनंद होतो. तेथे कुबेराचे घर होते. त्या घराच्या कमानी सोन्याच्या होत्या. त्याच्या भिंतीसुद्धा सोन्याच्या होत्या. त्याभोवती सुंदर बगीचा होता. त्यांच्यावर शोभा वाढवण्यासाठी पताका झळकत होत्या. त्या वाड्यात सुंदर बायका आत बाहेर करत होत्या. आपले दोनही हात कोपर्यात मोडून व कंबरेवर ठेवून तो बलभिम, कुबेराची नगरी मोठ्या कौतुकाने न्याहाळत होता. त्याच्या अंगाला चाटून मंद झुळूकी वहात होत्या. जे पाहून कोणीही संतुष्ट होईल असें ते दृष्य होते. त्या मंद झुळूकीबरोबर तो सुगंध पसरत होता ज्याचे वेड त्याच्या पांडवीला लागले होते ज्याकरता तो येथवर आला होता. त्यानंतर तो बलशाली कुंतीपुत्र त्या वाड्याचे निरीक्षण करू लागला होता. त्या वाड्याच्या परिसरात वावरणारे राक्षस अमाप रत्न, माणकांनी मढवलेले हार गळ्यात घालून फिरत होते. भिम कांहीं काळ स्तब्ध उभा राहून ते सगळे

पहात असतो. अखेरीस कशाच्याही परिणामाची पर्वा न करता तो हाडाचा क्षत्रिय त्यांना आव्हान देण्यासाठी आपले शंखू काढतो व जोरांने फुंकतो . ते आव्हानाचे शंखू वाजल्यावर त्याचे प्रतिस्पर्धी ताठ उभे रहातात. त्यांना प्रथम समजत नाही हे काय होत आहे. भिमाने त्याची आयुध तयार ठेवलेली होती. तेथे मजेत वावरणारे यक्ष आणि राक्षस त्याच्या अंगावर धावून गेले. ते यक्ष व राक्षस त्याच्या गदा, भाले, धनुष्य बाण असें सगळे सरसावून पुढे होत होते. ते पहारेकरी राक्षस व भिम ह्यांच्यात युद्ध सुरू झाले. भिम त्याच्या गदेने त्या सगळ्या हल्ल्याला परतवत असतो. त्याच वेळी त्याचे बाण व भाले राक्षसांच्या अंगात धुसून त्यांना गारद करत होते. राक्षस जमिनीवरून व आकाशातून असें त्यांच्या भ्रम उत्पन्न करणारे बाण भिमावर मारत होते. राक्षस त्यांच्या अंगातून पाऊस पाडू लागतात, त्यामुळें चक्रावलेल्या भिमाला ते चहुबाजूनी घेरतात, जसें सूर्याला ढगं वेढतात. त्या परिसरातील सर्व प्राणी ती लढाई पहात असतात. राक्षस व यक्ष त्यांच्या रणगर्जना करू लागतात परंतु, त्याचा कोणताही परिणाम भिमावर होत नसतो. तो त्या हल्लेकरी राक्षसांना व यक्षांना मारत रहातो. ते पाहिल्यावर ते यक्ष व राक्षस समजतात किं, हा कोणी वेगळा आहे व त्यामुळें ते घाबरतात. ते पाहिल्यानंतर भिम एक मोठी रणगर्जना करतो त्या आवाजामुळें सगळे राक्षस व यक्ष त्यांची आयुधे तशीच जागेवर सोडून दक्षिणेकडे धावत जातात. आपल्या सैन्याचा पराभव झाला हे पहाता वैश्रावणाचा मित्र राक्षस मनिमन भिमापुढे उभा होतो. त्या पळणार्या राक्षसांकडे पहात तो तुच्छतेने हसत बोलतो, "अरे राक्षसानो, तुम्ही कुबेराकडे जाऊन काय सांगणार? कीं, एका मर्त्य मानवाने तुम्हा सगळ्यांचा धुव्वा उडवला आहे"? ते बोलल्यानंतर तो मनिमत त्याची आयुध सरसावून भिमाच्या अंगावर चाल करून जातो. जसे एकादा मदांध हत्ती अंगावर यावा तसा तो भिमाकडे धावत जातो. भिम त्याच्यावर तीन बाण मारतो व त्याला जखमी करतो. तरीसुद्धा मनिमत त्याची अवाढव्य गदा भिमावर फेकतो. भिम त्याच्या तीक्ष्ण बाणांनी ती गदा उंच आकाशात भिरकावून देतो. त्यानंतर त्यांच्यात भिमाला आवडणार्या गदायुद्धाला सुरूवात होते. मनिमत अचानकपणे एक अशी गदा भिमाकडे फेकतो जिच्यातून आग येत असते. ती गदा भिमाच्या उजव्या हाताला लागते. त्याचा वार भिमाला असहय्य होता. त्याचे डोळें गरगरा फिरू लागतात. तीच गदा भिम उचलतो व मनिमतावर मोठ्याने

ओरडून फेकतो तितक्याच जोरांने. मनिमतावर ती येते तेव्हां तो ती पुन्हा उलट भिमावर मोठमोठ्याने रणगर्जना करत फेकतो. त्यामुळें दुखावलेल्या भिमाने त्याच्या बाणांने त्या गदेचा जोर कमी केला. त्यानंतर तो योद्धा वेगांने मनिमताला ठार मारण्यासाठी पुढे सरसावतो. जसें गरुड सापावर उडी मारतो. मनिमत उंच आकाशात उडी मारतो व वेगांने भिमावर चाल करून येतो. परंतु, भिमाने फेकलेली त्याची गदा मनिमताला वर्मी लागते व तो खाली कोसळतो. त्यानंतर सगळे परिसरातील जीव पहातात किं तो राक्षस मेला आहे. मनिमत मेलेला आहे हे पाहून इतर राक्षस पूर्वदिशेकडे आक्रोश करत धावत जातात. भिम एकाद्या सिंहासारखा त्या मेलेल्या मनिमताकडे पहात असतो.

अशारितीने यक्ष युद्ध पर्वाचा भाग चौथा संपला.

# यक्ष युद्ध पर्व

## (भाग पांचवा )

वैशंपायन सांगत असतात, तो सगळा गदारोळ त्या एरवी शांत असणार्या पर्वतावर सर्वांना ऐकू येतो. तो आवाज खाली अर्ष्टीसेनाच्या आश्रित स्थाईक असलेल्या पांडवांना व द्रौपदीला सुद्धा ऐकू येतो. त्यांना चिंता पडते, हे काय होत आहे. त्यांच्या सगळ्या मंडळींना कळत नाही काय झाले. युधिष्ठीर विचारतो भिम कोठे आहे, तेव्हां त्यांना समजते कीं, द्रौपदीने त्याला पाठवले आहे. ते समजल्यावर सगळे ब्राह्मण, युधिष्ठीर, धौम्य असें सगळे काळजीत पडतात. ते ठरवतात कीं, द्रौपदीला अर्ष्टीसेनाच्या भरवशावर ठेवून ते भिमाच्या शोधात सशस्त्र होऊन निघतात. तो उभा पर्वत ते चढू लागतात. शिखरावर पोहोचल्यावर तेथे काय झाले आहे ते पाहू लागतात. तेथे ते पहातात किं, महाशक्तीशाली राक्षस तेथे रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत पडलेले आहेत. त्यांचा बलभिम हातात गदा व दुसर्या हातात धनुष्य घेऊन एकाद्या कर्दनकाळासारखा तेथे बेभान असा उभा आहे. जणू दुसरा मेघावतच किं काय असा तो रुद्रावतारी भासत होता. ते पाहिल्यावर त्या पांडवांना व त्यांच्या बरोबर आलेल्या ब्राह्मणांना आणि धौम्यना हायसे वाटले. पांडव भिमाला आलिंगन देतात. त्या दैवी स्वरुप असलेल्या पांडवांमुळें लोकपाल तेथे आले आहेत असें कोणालाही वाटले असते. ते कुबेराचे घर व त्यापुढे पडलेले राक्षस पाहून युधिष्ठीर भिमाला विचारतो, "हे कसे घडले, केवळ हलगर्जीपणामुळें कां अज्ञानामुळें ते सांग. अरे वृकोदरा, हे तुझ्या हातून पाप झाले आहे". भिमा आपण हल्ली संन्याशाचे जीवन जगत असतांना असें प्रमाद होणे आपल्या कार्यात बाधा आणू शकतात. शास्त्रात सांगितले आहे किं, संन्याशाने असें कांहींही करता कामा नये ज्यामुळें त्या राज्याच्या अधिपतीचा अपमान होईल. ते पहाता तुझ्या हातून घोर अपराध झाला आहे. तू मात्र असें केले आहेस किं, त्यामुळें सर्वच देव तुझ्यावर अप्रसन्न होतील. असें म्हणतात, जो हित व कर्तव्याकडे दुर्लक्ष करतो तो पापाचरण करू लागतो. माझी तुला विनंती आहे किं कृपया असे कांही तू पुनः करू नकोस".

वैशंपायन पुढे सागतात, अशी विनंती करून त्याच्या मुद्द्याच्या समर्थनार्थ तो काहीं कवन गावून दाखवतो. ते होत असतांना बचावलेले राक्षस उठून लगबगीने कुबेराच्या वाड्याकडे धाव घेतात. ते वैश्रावणाच्या घरी पोहोचतात. ते मोठ्याने आक्रोश करत जे झाले ते त्यांच्या धन्याला सांगतात. कुबेर पहातो कीं, त्याच्या राक्षस सैन्याची किती दुर्दशा एका माणसाने केली होती. त्यांचे कपडे फाटलेले होते, त्यांच्या चिलखताचे तुकडे झाले होते. त्यांच्या अंगावर बाणाच्या जखमा स्पष्टपणे दिसत होत्या. फारच दयनीय अवस्थेत ते त्यांच्या राजापुढे उभे होते. राक्षसांचा सरसेनानी मनिमत त्या अंगणात जेथे ते युद्ध झाले मरून पडलेला होता. ते पाहून वैश्रावणाचे डोळे रागांने लालेलाल झाले होते. त्यांने त्याच्या सैन्याला तयार होण्यास सांगितले व तो स्वतः भिमाचा परामर्ष करण्यासाठी निघाला. थोड्याच वेळात ते सगळे त्या गंधमादन पर्वतावर असलेल्या रणांगणी, आकाशमार्गे पोहोचले. त्याच्या भोवती त्याचे गुणगान करणारे गंधर्व होते. शेकडो यक्ष त्यांच्या आयुधासह उपस्थित होते. त्यातील कांहीं खूप अजस्त्र आकाराचे होते, असें कीं, त्यांना पाहूनच कोणाची धडकी भरावी. रत्नजडीत वस्त्राने विभूषित असा तो संपत्तीचा देव भिम व इतर पांडवांना तेथे उपस्थित असलेले पहातो. पांडवसुद्धा त्याला येतांना पहातात. कुबेराभोवती यक्षांचा गराडा पडला होता, त्यामुळें तो सुरक्षित होता. कुबेर त्यांना पहातो, वैश्रावण त्याच्या पुष्पक विमानातून जे विश्वकर्माने घडवले होते, उतरतो. ते सर्व शस्त्रसज्ज असे पंडुचे पुत्र तेथे उभे होते. त्यांना पाहिल्यावर कुबेर शांत झाल्यासारखा वाटतो. तो स्वताला आवरतो. तो स्मितहास्य करत पुढे होतो. कुबेराच्या अंगावर रत्नजडीत अंगरखा होता व हातात त्याचे तलवार व फांसा होते गळ्यात माळा होत्या सुगंधी फुलांच्या. त्यानंतर इतर यक्ष ते पाहून कोणताही राग मनात न ठेवता तेथे पांडवांभोवती उभे रहातात. त्यांच्या पुढे वैश्रावण होते. असे परिस्थितीचे बदललेले स्वरुप पाहून पांडवसुद्धा थोडे स्वस्थ होतात. पुनः एकदा भिम मात्र लढण्याच्या तयारीत एकटक नजरेने कुबेराकडे पहात होता. भिमाची ती तयारी पाहून वैश्रावण युधिष्ठीराला उद्देशून बोलतो, "अहो पार्थ, सगळे जग जाणते कीं, तुम्ही फक्त चांगलेच काम करत असता. म्हणून तुम्ही त्या आश्रमात निःसंकोचपणे रहात अहात. मी तुझ्या बलशाली भावावर रागावलेला नाही. कारण त्याने नियतीने ठरवलेले काम केले आहे. त्या कामासाठीच तर त्याच्या पत्नीला त्याला येथे

पाठवण्याची इच्छा झाली व तुझा भिम येथवर आला. त्यांनी ज्यांना मारले ते माणसाच्या हातून मरण्याचे ठरलेले होते. त्यांचा अहंकार विशेष करून माझ्या मित्र मनिमतचा फार वाढला होता. ते मेल्यामुळें कांहीं दोष तुझ्या भावाला लागत नाही. म्हणून माझ्या मनांत तुझ्या भिमाबद्दल कोणताही रोष नाही. खरे पहाता, भिमाने मला एका शापातून मुक्त केले म्हणून मी त्याचे आभार मानत आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, असें बोलून कुबेर भिमाला सांगतो, "अरे मुलां, कुरु कुलदिपका, मला तुझ्यावर राग आलेला नाही तरी शांत हो. तू तुझ्या पत्नीच्या इच्छे करता येथे आला होतास. देवांचे नियम मोडून तू ते केलेस. राक्षस व यक्षांचा नाश केलास. तुझ्या ताकदीचे मी कौतुक करतो. तुझ्यामुळें मी एका अगस्त्य ऋषीने दिलेल्या शापापासून मुक्त झालो आहे. म्हणून तू निश्चिंत रहा". युधिष्ठीराकडे पहात तो बोलतो, "तुझ्या भावाने ते करून माझी खूप मदत केली आहे". ते ऐकल्यावर युधिष्ठीर वैश्रावणाला विचारतो, "अहो देव मला सांगा, तो काय प्रसंग होता ज्यामुळें ऋषी अगस्त्य तुम्हाला शाप देत होते? माझी तेवढी उत्सुकता पूर्ण करा. त्यांनी मनात आणले असते तर त्याच क्षणी ते तुझा नाश करू शकले असते पण तसे त्यांनी कां केले नाही"?

तो प्रश्न ऐकल्यावर तो संपत्तीचा देव त्याला सांगतो, "फार प्राचीन काळी कुशस्थली देवांचे सम्मेलन भरले होते. त्या सभेत महापद्म एवढे यक्ष उपस्थित होते. मीसुद्धा तेथे आमंत्रित होतो. तेथे जात असतांना वाटेत आम्ही यमुनेच्या किनारी सर्वश्रेष्ठ ऋषी अगस्त्य एक यज्ञ करत होते ते पाहिले. दोनही हात वर उंच करून ते उत्तरेकडे तोंड करून ध्यान करत होते, त्यांना पाहिले. तेव्हां माझ्याबरोबर असलेला मनिमत गम्मत करण्यासाठी माझ्या समक्ष त्या ऋषीच्या डोक्यावर मुतला. ते त्याचे कृत्य अक्षम्य होते. त्यावर संतापलेले ऋषी त्यांचा राग आवरू शकले नाहीत व त्यांनी मला व मनिमतला शाप दिला. ते बोलले, ज्या अर्थी तुझ्या समक्ष तुझा मनिमत असें करत आहे त्या अर्थी तू सुद्धा ह्या कृत्यास तितकाच जबाबदार आहेस. तुम्हा दोघांचा अहंकार मातला आहे म्हणून मी शाप देतो कीं, तू अथवा तुझा मित्र एका माणसाच्या हातून मारले जाल. तसें झाले तरच तुमचा अहंकार आवरला जाईल. कोण तरी एक मरणार होते. भिमांने मनिमतला मारून मला जीवनदान केले आहे.

त्याचा अर्थ, मी त्या शापातून मुक्त झालो कारण, मनिमत मारला गेला व मी वाचलो आहे. म्हणून मी तुझ्या भावाचे आभार मानतो". असें कुबेर सांगतो.

अशारितीने यक्ष युद्ध पर्व भाग पांचवा संपला.

# यक्ष युद्ध पर्व

## (भाग सहावा )

पुढे कुबेर सांगतो, "अहो युधिष्ठीरा, चिकाटी, सामर्थ्य, समयसुचकता, भाग्य आणि वेळ असें सगळे साधले तर यश प्राप्त होते. कृतयुगात माणसे धैर्याने आपली कामे करत असतं. त्यांना त्यांची हिम्मत कशी केव्हा व कोठे दाखवायची ते जाणत होते. क्षत्रिय ज्याला त्याची ताकद कशी केव्हां व कोठे वापरावयाची ते जाणतात ते जगावर राज्य करत असतं. राज्य करण्यापुरते हे तत्त्व मर्यादित नाही तर सगळ्याच कामात ते उपयोगी येते. जो हे जाणून आपली कामं करतो तो पुढील आयुष्यात सुद्धा यशस्वी होतो. हे तत्त्व चांगले जाणत असल्यामुळेंच शक्र आणि वसु स्वर्गात श्रेष्ठ ठरले. जो क्रोधाच्या प्रभावाखाली काम करतो तो पापाचा मार्ग कळत नकळत आचरतो. त्या परिस्थितीत तो योग्य काय व अयोग्य काय ते समजण्याच्या मनस्थितीत रहात नाही व नष्ट होतो. त्याचे कार्य व्यर्थ जाते. ज्याला वेळ व कार्य ह्यांचे संतुलन करण्याचे माहीत नाही तोसुद्धा नाशास कारणीभूत होतो. जो सर्वच गोष्टीत प्रावीण्य मिळवण्याचा प्रयत्न करतो तो घाई करतो त्यात चुका करतो व फसतो. तुझा भिमसेन बेधडक आहे, त्याच्या कर्तव्याबाबत अनिश्चित, हट्टी, लहान मुला सारखा बालिश असून त्याला त्याच्या कृत्याच्या परिणामांचा अंदाज घेण्याची माहिती नाही. म्हणून तू, जो हे मर्यादा तत्त्व जाणतो, त्याचा ज्येष्ठ बंधू आहेस, त्याला समज देत जा. आता तुम्ही अर्ष्टीसेनाच्या आश्रमात निर्धोकपणे जा व तेथे जिश्नु येईस्तोवर रहा. अरे माणसांच्या राजा, माझे गंधर्व ज्यांची नेमणूक मी केली आहे व जे अलका कडे रहातात, ते तुम्हाला संरक्षण देतील". नंतर तो वैश्रावण तेथे जमलेल्या ब्राह्मणांनासुद्धा प्रबोधन करतो, "अहो ज्ञानी लोकांनो, भिम तुमच्या बरोबर आहे, त्याला आवरण्यात युधिष्ठीराला सहाय्य करावे. कारण एकाच्या चुकीमुळें बाकीच्यानासुद्धा दुर्दैव भोगावे लागेल ते रास्त होणार नाही. माझी माणसें तुमच्या सगळ्या गरजा पुरवतील. त्यात मांस असेल, पेये असतील, फळं असतील, जे तुम्हाला हवे ते सर्व ते तुम्हाला आणून देतील पण भिमाला आवरा". त्यानंतर तो धनाचा देव युधिष्ठीराकडे पहात बोलतो, "तुम्ही सगळे दैवी शक्तींची लेकरे अहात, तू यमाचा, अर्जुन इंद्राचा, भिम वायुदेवाचा, शेवटचे दोघे अश्विनीचे अहात म्हणून मी तुमची

सगळी सोय करणार आहे कारण महेंद्रने तशी आज्ञा केली आहे. भिमानंतरचा फाल्गुनी सध्या इंद्राकडे आहे. त्याचे काम अजून पूर्ण झालेले नाही. स्वर्गात रहाण्यासाठी जे उत्तम गुण हवे असतात ते सगळे तुझ्या अर्जुनात त्याच्या जन्मापासून आहेत. संयम, दयाबुद्धी, सामर्थ्य, मेधा, प्रज्ञा, नम्रता, विचारीपणा, धैर्य आणि हिम्मत ही लक्षणं त्याच्यात उपजत आहेत व तो भिमाला संयमित करू शकतो परंतु, ह्यावेळी तो नव्हता म्हणून हे झाले. आणखीन एक सांगतो, युधिष्ठीरा, तुझ्या कृष्णास समज दे कीं, ती ह्यापुढे भिमाला हुसकवणार नाही. भिम तिच्या खूषीसाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो म्हणून ते तू पहा. ह्यावेळी व ह्याआधी सुद्धा एकदा तिच्या आग्रहाखातर तो भयंकर धाडस करून राहिला आहे. असें पुनः पुनः होणे चांगले नाही. भिमामध्ये भ्रष्ट क्षत्रियत्व वाढत आहे ते थांबवा तुम्ही कुलिन क्षत्रियत्वाची परंपरा चालवणारे अहात. बायकोच्या नसत्या आग्रहाखातर जिश्नु कधीच असें कृत्य करणार नाही. हा महत्वाचा फरक तुझ्या दोन भावांत आहे. त्याच्या पितराच्या, गंधर्वांच्या व देवांच्या मर्जीखातर तो तेथे मजेत रहात आहे. तो कुरुवंशाची शान आहे. त्याचे कार्य उरकले किं, तो तुम्हाला येऊन मिळेल, तोवर भिम व कृष्णावर लक्ष देऊन सांभाळ. तुला आणखीन एक सांगतो. तुमचे एक पूर्वज शंतनु जिश्नुच्या कामगिरीवर फार संतुष्ट आहे. ते तुम्हा सगळ्यांची जातीने चौकशी करत आहेत".

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर भिमाला त्याची चूक समजते व तो त्याची उगारलेली आयुध खाली करत कुबेराला लवून नमस्कार करतो. ते पाहून समाधानी झालेले धनाचे देव त्याला शुभेच्छा पुढील प्रकारे देतात, "अरे शतृघ्न योद्ध्या, मित्रांचे भले करणार्या, दुष्कृत्य करणार्यांचा नाश करणार्या पांडवा, आमच्या सुखदायी जगात आनंदात रहा. माझे यक्ष तुला त्रास देणार नाहीत. लवकरच तुझा प्रिय बंधू इंद्राचा निरोप घेऊन तुम्हा सगळ्याच्या मध्ये सामील होण्यासाठी येत आहे". एवढे बोलून तो गुह्यकांचा राजा अंतर्धान पावतो. त्याच्या बरोबर आलेले हजारो यक्ष सुद्धा निघून जातात. त्यांच्या जाण्याने मोठा गजबजाट होतो जणू हवा जोरांने हलत आहे. त्यानंतर मृत राक्षसांची कलेवरं तेथून हलवण्यात येतात. अगस्त्य ऋषींच्या शापाची मर्यादा पूर्ण झाली होती. त्यामुळें ते

राक्षससुद्धा त्या शापाच्या बंधनातून मुक्त झाले होते. त्यानंतर ते पांडव सुखाने तेथे राहू लागले.

अशारितीने यक्ष युद्ध पर्वाचा सहावा भाग संपला.

# यक्ष युद्ध पर्व

## (भाग सातवा )

वैशंपायन पुढे सांगतात, एके दिवशी सकाळी त्यांचे प्रातर्विधी उरकून व नित्याच्या प्रार्थना संपवून ऋषी धौम्य पांडवांच्या भेटीला आले होते. त्यांच्या बरोबर ऋषी अर्ष्टीसेनसुद्धा होते. पांडवांनी त्या गुरूद्वयांना लवून वंदन केले. त्यानंतर युधिष्टीर धौम्यना विचारतात, "अहो गुरूवर्य, मला सांगा, पृथ्वीवर कोण कोण दैवी (अदृष्य) सृष्टीत रहातात व ते काय करत असतात". त्यानंतर धौम्य युधिष्टीराचा उजवा हात पकडून त्याला बोलतात, "ऐका अहो राजर्षी, हा पर्वतांचा राजा मंदार समुद्रा पर्यंत पसरलेला आहे. अहो पांडवानो इंद्र आणि वैश्रावण त्या प्रदेशावर सत्ता राखतात जेथे अरण्ये व कुरणं पसरलेली आहेत. ज्ञानी सांगतात हा इंद्राचा व वैश्रावणाचा प्रदेश आहे. त्यात सिद्ध आणि साध्य तसेंच दैवी शक्ती त्यांचे कौतुक करत असतात. उगवत्या सूर्याचेसुद्धा स्तवन करत असतात. त्या प्रदेशाच्या दक्षिणेकडे पसरलेल्या भागावर यमाचे राज्य असते. तेथे मृत आत्मे वास करतात. त्यालाच सन्यामन, मृतांचे राज्य असें म्हणतात. तो प्रदेश पहाण्यासाठी सुंदर आहे. त्यात समृद्धी आहे. तेथे राज्य करणार्या राजाला अस्त असें नांव आहे. जेव्हां सूर्य तेथे पोहोचतो, सत्याचे तो संरक्षण करतो, वरुण देव तेथील जीवांचे संरक्षण करत असतो. त्याशिवाय उत्तरेकडे जो प्रबळ भाग आहे, त्याला महतनेरू असें म्हणतात. तेथे पवित्र ब्रह्म असतात ते त्यातील दक्ष सातवे होते. येथेच ते सात ऋषी रहातात, ज्याच्यात वसिष्ठ मुख्य आहेत. तेथून ते अप्रतिम मेरू पर्वताचे शिखर दिसत असते जेथे ब्रह्म रहातात. त्याच्या जवळच तो प्रदेश आहे जेथून ह्या सृष्टीचे मूळ कारण असलेले असते. त्याला नारायण म्हणतात. ज्याला आदि नाही व अंतसुद्धा नसतो. तेथे अशा शक्तिचा संचार असतो ज्याची तुलना स्वर्गाशी करता येणार नाही. त्याचे तेज असें असते जे देव, दानव असें कोणीही पाहू शकत नाहीत. मेरूच्या पूर्वेला तो विलक्षण तेजस्वी भाग आहे. अरे, मुला, ह्या विश्वाचे मूळ कारण ज्यातून सगळी सृष्टी उत्पन्न झाली, ज्यांना पहाता येते त्यांना ते विलोभनीय असें वाटते. महर्षी, ब्रह्मर्षी, अशा मोठ्या मोठ्यानासुद्धा तेथे प्रवेश नाही. तेथे फक्त यती जाऊ शकतात. तेथे जाणार्या यतींना त्यांचे तेज आवरावे लागते. कारण, तेथे फक्त ते विश्वाचे

तत्त्व चमकू शकते. त्याचे तेज वास्तविक नसते, ते शुद्ध अध्यात्मिक असते. त्यात फक्त आनंद असतो. त्याचे वर्णन करता येणार नाही. फक्त खरी तपस्या, पावित्र्य असलेले यती नारायणाची सेवा करत असतात. जे त्याच्या पर्यंत त्यांच्या पावित्र्यामुळें पोहोचतात ते पुनः ह्या सृष्टीत भोग भोगण्यासाठी येत नाहीत. परंतु, नारायणाच्या नेमून दिलेल्या कार्याच्या पूर्ततेसाठी अवतारी म्हणून येत असतात. त्या तेथे पोहोचण्याला कांहीं मोक्ष सिद्धी असें म्हणतात. त्या भागाला र्हास, अंत किवा सुरुवात नाही. सगळे तारे, सूर्य, चंद्र त्या मेरूच्या भोवती चक्रा मारत असतात. जेव्हां सूर्य जो अंधाराचा दुश्मन आहे तेथे फिरतो तेव्हां इतर तारे त्याच्यापुढे फिक्के पडतात. त्यानंतर तो दिनकर संध्याकाळ झाल्यावर उत्तरेच्या दिशेने पूर्वेकडे सरकतो. त्याचप्रमाणे, चंद्रसुद्धा तसांच क्रम राखून त्याच्या प्रदक्षिणा जातो. त्याच्या फिरण्यामुळें महिन्याचे भाग तयार होतात. अशारितीने ते फिरत असल्यामुळें पृथ्वीवरील जीवांचे जगणे सुकर होत असते. जेव्हां सूर्य दक्षिणायनात जातो तेव्हां पृथ्वीच्या येथील भागात हिंवाळा सुरु होतो. त्यानंतर सूर्य पुनः उत्तरेकडे सरकू लागतो व त्यांमुळें उन्हाळा येथे सुरू होतो. त्यानंतर त्याच्या कृपेने समुद्रातील पाणी आकाशात जाते व वरुणदेवाचे कार्य सुरु होते व ह्या गोलार्धात पावसाळा सुरु होतो. त्यातून नवीन जीवसृष्टीची सुरुवात होते. त्यावेळी वारे वहातात, उष्ण गरम वातावरण अनुभवास येते. अशारिताने एक अवतरण पूर्ण झाल्यावर सूर्य पुनः दुसरे अवतरण सुरू करतो. असे अव्याहतकपणे चालू आहे. हे कधीही थांबत नाही. त्या सूर्य व चंद्राच्या चक्राकार फिरण्यामुळें काळ मोजला जातो त्यात कस्थ, क्षण असें भाग असतात. सूर्य सगळ्या चराचरांचा कर्ता आहे. अशी ही सृष्टी आहे, ज्यात दृष्य व अदृष्य सृष्टी एकमेकांना पुरक असें काम करत असतात. कोणीही एक दुसरीपेक्षा वरीष्ठ नसते.

अशारिताने यक्ष युद्ध पर्व भाग सातवा संपला.

# यक्ष युद्ध पर्व

## (भाग आठवा )

वैशंपायन पुढे सांगतात, त्या पवित्र पर्वतावर पांडव, जे सदैव व्रतस्थ जीवन जगत असतात, रहात असतांना त्यांना धौम्याने वर्णन केलेल्या त्या जागेबद्दल जबरदस्त कुतूहल उत्पन्न होते. ते आता अर्जुनाला भेटण्यासाठी उताविळ झालेले असतात. अनेक गंधर्व आणि महर्षी पांडवांना भेटत असतं. पांडव त्या पर्वताकडे पोहोचतात जेथे सृष्टीसौंदर्य अप्रतिम होते. तेथूव वनश्री अवर्णनीय होती. सगळी झाडं फुलाफळांनी डवरलेली होती. त्या प्रदेशात वावरतांना पांडवांना असा प्रसन्नतेचा अनुभव येत होता त्याचे वर्णन करता येणार नाही. त्या ठिकाणी आल्यावर त्यांचा उत्साह द्विगुणीत झाला. तेथे मोर, लांडोर, करकोचे, हंस असे पक्षी बागडत होते. तेथे असलेले तलाव कमळाच्या फुलांनी भरलेले होते. त्या तलावांभोवती असलेल्या वृक्षांचा पर्णभार असा पसरलेला होता किं, त्या तलावावरील आकाश झाकलेले होते. त्यामुळें तलावातील पाण्यावर सूर्यप्रकाश पडत नव्हता. तो प्रदेश असा होता कीं, धनाच्या देवाला आवडेल. तो नेहमी त्या परिसरात फेरफटका मारण्यासाठी येत असें. त्या पहाडाच्या उंच शिखरांना ढगांनी गराडा घातला आहे असे वाटत होते. त्या प्रदेशाच्या मुलभूत गुणधर्मामुळें असेल कदाचित, तेथे रात्र आणि दिवस वेगळे जाणवत नव्हते. पांडवांनी त्या पहाडाच्या शिखरावरून सूर्योदय व सूर्यास्त पाहिले. त्या प्रदेशात अंधाराचा मागमुस नव्हता. धौम सांगतात पांडवाना कीं, असा प्रकाश सर्वत्र पसरणे अशा गोष्टीचे प्रतिक आहे कीं, तुमचा बंधू तुम्हाला भेटण्यासाठी येत आहे. ते समजल्यावर सगळे पांडव व त्यांच्या सोबतीत असलेले ब्राह्मण वेदाचे वाचन सुरू करतात. ते नियमितपणे सगळे उपचार जे एका वैदिकाला करणे आवश्यक असते ते सुरू होतात. जे तीन नियम प्रत्येकाला पाळणे बंधनकारक असते ते म्हणजे, व्रतस्थता, सत्त्वशिलता आणि तपस्या करणे हे ते सुरू करतात. अर्जुन लवकरात लवकर त्यांच्यात मिळावा म्हणून वेगळी प्रार्थना तो करत असतात. अर्जुनाच्या तेथे तोसुद्धा योगिक साधनेत गुंतलेला होता. त्यांने मिळवलेल्या शस्त्र अस्त्रांचे वापरण्याचे तंत्र व मंत्र लक्षात ठेवण्यासाठी तसा योगिक उपक्रम करणे जरुरीचे होते. पांडव त्या कल्पनारम्य वातावरणात किंर्तीची

आठवण करत असतात. रात्रंदिवस ते असें प्रतिक्षा करणे चालू असते. त्या चिंतेत त्यांच्या मनातून आनंद संपुष्टात आला होता. पांच वर्षापूर्वी धौम्यांच्या संम्मतीने तो शस्त्र ताब्यात घेण्यासाठी त्या कम्यक अरण्यातून निघाला होता. त्या विचारात गुंतलेले पांडव तो निसर्गाचा आनंद समजण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यांना धनंजयाचा घोर लागला होता. त्यांना कांहीं सुचत नव्हते, कांहीं गोड वाटत नव्हते. अर्जुनाशिवाय सगळे त्यांना भकास झाल्यासारखे वाटत होते. शक्राच्या घरी तो पांच वर्षे राहिला होता. तेथे राहून स्वबळावर त्यांने अग्नी, वरूण, वायू, विष्णू, इंद्र, पशुपती, ब्रह्मदेव, परमेस्थी, प्रजापती, यम, सविता, त्वश्त, वैश्रावण अशा देवांकडून विविध आयुध मिळवली होती ती तो आणणार होता. त्या दरम्यान त्याने शेकडो यज्ञ केलेले असतात. असा पांडवांचा आणि द्रौपदीचा सखा अखेरीस गंदमाधन पर्वतावर येऊन पोहोचतो. त्याला पाहून सगळ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

अशारितीने यक्ष युद्ध पर्वाचा आठवा भाग संपला.

***टीपः*** *व्रतस्थता, सत्त्वशिलता आणि तपश्चर्या ह्या तीन गोष्टींचे आचरण करणे हे हिंदूंसाठी बंधनकारक असते. जो त्यांचे पालन करतो ते चांगला हिंदू असें समजले जाते. ह्या तिघांचा अभ्यास करणे ह्यालाच हिंदू धर्माचा अभ्यास करणे असें समजले जाते. त्या तीन गोष्टींची विशेष माहिती येथे दिली आहे. त्यावरून हिंदूधर्माचे पालन करणे म्हणजे काय करणे ते समजते. त्याशिवाय पुजापाठ, देवतांची व्रतवैकल्ये, उपवास तापास हे करण्याचीसुद्धा पद्धत आहे. पण त्या बंधनकारक नसातात. त्या ऐच्छिक असतात. ज्या तीन गोष्टी बंधनकारक आहेत त्याची माहिती पुढे दिली आहे.*

***व्रतस्थता*** *- ब्रह्मचर्य, मनो निग्रह (क्रोध, लोभ आणि मोह ह्यांचे नियंत्रण), शांत वृत्ती, मर्यादा, दुसर्याशी स्वताची तुलना न करणे, मिताहार आणि मौन हि साधारण व्रतस्थतेची लक्षणे आहेत.* ***ब्रह्मचर्य पालन म्हणजे काय*** *– त्यात भोगेंद्रीयांचे संयमन करावयाचे असते. त्यासाठी औदासिन्य (भोगांबद्दल) राखण्याची सवय करावयाची असते. त्यात सगळ्या भोगेंद्रीयांचे नियमन होते. खाणे, पिणे, निद्रा, संभोग, ह्यांचे मर्यादा योगक्षेमानुसार राखणे हे*

*त्याचे कार्य असते. सर्वप्रकारच्या भोगांचे व्यसन लागू शकते तसें झाले तर त्यातून पाप कर्म सुरू होते. म्हणून सर्व भोग मर्यादीत ठेवणे हांच पुण्याचा मार्ग समजला जातो.*

***सत्त्वशिलता*** *- तपश्चर्या करणे, खरे बोलणे, हित करणे, क्षमा करणे, वासनांना आवर घालणे आणि वेदांचा अभ्यास (ज्ञानसाधना) करणे, वाईट काम करणार्याला साथ न देणे ही सत्त्वशिलतेची लक्षणे आहेत.*

***तपश्चर्या*** *- विपाशना साधना करणे अथवा विचारशून्य अवस्थेत चित्त राखणे. त्यासाठी श्वासोंश्वासावर चित्त केंद्रीत करावयाचे असते. त्याला ध्यानसाधना असेंसुद्धा म्हणतात ती न थांबता सातत्याने केल्यास ती तपश्चर्या ठरते. विपाशना म्हणजे, डोळे मिटून श्वासोंश्वासावर लक्ष केंद्रीत करून विचारशून्य अवस्थेत ध्यान करणे, ह्याला विपाशना, सहज प्राणायाम, सोहंम साधना अशी विविध नावे आहेत. जे देव मानतात त्यांना त्यांच्या दैवतावर लक्ष केंद्रीत करून तपश्चर्या करावयाची असते. दिवसातून अर्धा तास करावे.*

***खरे बोलणे, करणे*** *म्हणजे ज्यात सर्व निष्पाप जीवांचे हित आहे असें बोलणे, करणे.*

***पापाची व्याख्या*** *– ज्या प्रकारचे विचार सतत करतो व त्या प्रमाणे वागतो त्यामुळें आपली अध्यात्मिक अवस्था बिघडते त्याला पाप म्हणतात.*

***पुण्याची व्याख्या*** *– ज्या प्रकारचे विचार सतत करतो व त्या प्रमाणे वागतो त्यामुळें आपली अध्यात्मिक अवस्था सुधारते त्याला पुण्य म्हणतात.*

*मूलभूत हिंदू धर्माची माहिती आपण येथे पाहिली आहे. त्याशिवाय असंख्य गोष्टी परंपरेने विविध हिंदू समाजात प्रचलित आहेत. ते ऐच्छिक असतात म्हणून हिंदू धर्म बहुरुपी आहे असें समजतात. ज्याला जे रुप आवडेल त्याने ते आचरणात आणावे असे आहे परंतु, वर दिलेले तीन नियम मात्र सर्वांना बंधनकारक असतात. कांहीं एकाद्या रुपाचे समर्थन करतात तर दुसरे कोणी दुसर्या रुपाचे समर्थन करतात. त्या वादात शहाणे हिंदू पडत नाहीत. कांहीं एक देव मानतात कांही असंख्य मानतात, कांहीं दोन मानतात, कांहीं देव मानत नाहीत. कांही साधूंची, पिशाच्यांची पुजा करतात. असे सगळे वैकल्पिक प्रकार आहेत. त्यात विश्वास करणारे सगळे सारखेच हिंदू असतात. असें वैविध्य इतरत्र आढळत नाही. देवांच्या कल्पनेनुसार विविध कर्ममांड (पुजा, व्रते, उपास तापास इत्यादि) विकसित झाली व त्यांना हिदू धर्म समजण्याची चूक होत असलेली आपण पहात आहोत.*

ह्या वैविध्यतेचे कारण, हिंदू परंपरा अनेक प्रकारच्या विचारप्रणालींतून विकसित झाली आहे. तरीसुद्धा, सर्व हिंदू चार गोष्टी मानतात आणि जर मानत नसेल तर तो इसम हिंदू समजला जात नाही. त्या चार गोष्टी अशा, तो पुनर्जन्म मानतो, तो अद्वैत सिद्धांत (विश्वाचे मूळ एकच आहे असें मानणे) मानतो, तो कर्मविपाकाचा सिद्धांत मानतो व तो शक्तिसातत्याचा सिद्धांत मानतो.
वस्तुतः कर्मकांड कमी महत्वाचे असले तरी पौरोहित्याचे प्राबल्य वाढल्याने त्या लोकांनी त्यांच्या मतलबासाठी त्याला अवास्तव महत्व दिले आहे. कर्मकांडाची उपयुक्तता व त्याच्या मर्यादा हिंदूंना शिकाव्या लागतील.

बहुतेक हिंदू आज जन्माने हिंदू आहेत त्यांना कदाचित हे चार मुलभूत सिद्धांत माहीत नसतील तर ते त्याने समजून घ्यावेत म्हणजे तो त्याच्या हिंदू मान्यता विशेष जागरुकपणे आचरणात आणू शकेल. ह्या विवेचनातून हे स्पष्ट होते किं, देव मानणे अथवा न मानणे हिंदू ठरण्यासाठी आवश्यक नसते.

# यक्ष युद्ध पर्व

## (भाग नववा )

वैशंपायन सांगत असतात, पांडव अर्जुनाचा विचार करत असतां, एक दिवस इंद्राचा रथ त्यांच्या रहाण्याच्या जागी येऊन पोहोचला. तो रथ इंद्राचा सारथी मताली चालवत होता. त्या रथाच्या पाश्वभागातून धुराशिवाय ज्वाळा येत होत्या त्याच्या प्रकाशाने आकाश उजळून निघाले. जसा तो उडणारा रथ जमिनीवर आला ते पहातात किं, त्यामध्ये जिश्नु बसलेला होता. त्याच्या अंगावर नवीन बनवलेले कपडे होते व गळ्यात फुलांच्या माळा होत्या. तो त्याच्या शस्त्रभारासह खाली उतरतो. उतरल्यावर प्रथम तो धौम्य ऋषींच्या पाया पडतो. त्यानंतर युधिष्ठीराचे पाय धरतो. त्यानंतर वृकोदराचे पाय स्पर्श करतो. त्यानंतर नकुल व सहदेव त्याच्या पाया पडतात. त्यानंतर तो कृष्णाकडे जातो व तिचे क्षेमकुशल विचारतो. एवढे सोपस्कार पूर्ण झाल्यावर तो मोठ्या भावाजवळ जाऊन उभा रहातो. त्याच्या आगमनाने जो हर्ष त्या सगळ्यांना झालेला असतो त्याचे वर्णन करता येणार नाही. अर्जुनाचा आनंद त्याच्या चेहर्यावर स्पष्टपणे दिसत होता. त्यानंतर सगळे पांडव त्या महेंद्रच्या रथाला प्रदक्षिणा करतात. त्या रथातून इंद्राने दितीचे सात दैत्य ठार मारले होते. तो नमुचीचा वध करणार्या इंद्राची रथ होता. त्यानंतर ते आनंदीत झालेले सगळे पांडव इंद्र आणि मतालीचे आभार मानतात. ते त्या विलक्षण सामर्थ्य असलेल्या रथाची पहाणी करतात. इंद्राने त्याच्या मुलाला पांच वर्षे सांभाळून त्याचे शिक्षण पूर्ण करण्यात मदत केली म्हणून सगळे पार्थ त्याची पुजा करतात. त्यानंतर मताली रथात बसतो व तो रथ परत फिरतो. आता अर्जुन त्याच्या पुत्राच्या मातेस एक अमुल्य रत्न भेट देतो. त्याशिवाय बरेच अमुल्य दागिने शक्राने त्याच्या सुनेसाठी पाठवलेले असतात. ते तो द्रौपदीला दाखवतो. त्या रत्नांच्या तेजाने सभोवर चमकून निघते. त्या सगळ्या प्राथमिक गोष्टी झाल्यावर त्या सगळ्यांची बैठक भरते त्यात धौम्य व इतर ब्राह्मण उपस्थित असतात त्यात अर्जुन त्याच्या प्रवासाचा संपूर्ण वृतांत सांगू लागतो. तो जे सांगतो त्यात कोणी कोणते अस्त्र व शस्त्र त्याला शिकवले व त्याचा सराव त्याने कसा केला ते सगळे सांगितले. तो सांगतो, इंद्राकडून, वायू कडून, महादेवाकडून तो कशी ती आयुध मिळवतो

ते सविस्तरपणे सांगतो. त्याच्या वर्तणूकीने कसे सगळे संतुष्ट होते ते सांगतो. त्याच्या एकचित्ताने अभ्यास करण्याचे सुद्धा कसे कौतुक होते ते सांगतो. त्यांनतर त्याला प्रवासाची क्षीण आला आहे हे समजल्यावर युधिष्ठीर ती सभा आटोपती घेतो व त्याला विश्रांती घेण्याचा सल्ला देतो व ती सभा संपते. अर्जुन त्या रात्री त्याच्या धाकट्या दोन भावांच्या बरोबर निजण्यास जातो व तेथे तो त्यांना स्वर्गातील विविध अनुभव सांगत सांगत ते निजतात.

अशारितीने यक्ष युद्ध पर्वाचा नववा भाग संपला.

# यक्ष युद्ध पर्व संपले

## (भाग दहावा )

वैशंपायन पुढे सांगतात, रात्रभर झोपल्याने त्याचा क्षीण उतरतो. दुसर्या दिवशी ते चार भाऊ आपल्या मोठ्या भावाची पुजा करतात. ते होत असतांना त्यांना ऐकूं येतात ते स्वर्गीय नाद जे आकाशातून उमटत होते. त्यात विविध नादवृंदांच्या धूनी होत्या. त्याबरोबर रथांच्या चाकांचा गडगडाट सुद्धा मोठ्या प्रमाणात होता. घंटानाद होता. त्याशिवाय निरनिराळ्या प्राण्यांचे आवाज ऐकू येत होते. जणूकाय ते सगळे पांडवांसह युधिष्ठीराची पुजा करत आहेत. त्या सुमारास त्यांना इंद्राचा रथ वेगांने पृथ्वीच्या दिशेने येत असल्याचे जाणवते. त्या इंद्राच्या रथाबरोबर बरेच गंधर्व आणि अप्सरा त्याचे गुणगान करत येत होते. त्या रथाचे घोडे सोन्याच्या दागिन्याने सजवलेले होते. तो रथ गडगडाट करत येत होता. अशारितीने तो तेजस्वी देवांचा राजा पार्थाकडे पोहोचला. रथ त्या आश्रमाकडे आल्यावर तेथे थांबला व त्यातून शक्र खाली उतरले. युधिष्ठीर त्याला आलेले पहाताच पुढे होतो, त्याच्या सह त्याचे चार भाऊसुद्धा त्याच्यापुढे जातात व त्याचे स्वागत करतात. रिवाजा नुसार त्या देवांच्या राजाची रीतसर पुजा होते. त्याच्या दर्जाची योग्य दखल घेऊन ती केली जाते. त्या विधीनंतर धैर्यधर धनंजय पुरंदरापुढे वाकून नमस्कार करतो. त्यानंतर तो इंद्रपुत्र नम्रपणे खाली मान घालून त्याच्या बाजूला उभा रहातो. फाल्गुनाचे ते वागणे पाहून त्याचा पिता त्याच्यावर खूष झालेला दिसतो. त्याची योग्य दखल पांडवांचा मोठा भाऊ युधिष्ठीर घेतो व अर्जुनाच्या कपाळाचे चुंबन घेतो. ते सगळे झाल्यावर इंद्र बोलण्यास सुरुवात करतात. ते युधिष्ठीराकडे पहात बोलतो तू पृथ्वीवर राज्य करशिल. तुम्हा सगळ्या पांडवांना आम्हा देवांचे सदैव शुभाशिर्वाद आहेत. हा तुमचा भाऊ पांच वर्षे तपस्व्याचे जीवन जगला व ब्रह्मचर्य पाळून त्याने फार मोठी शक्ती संपादन केली आहे. त्याचे व्रतस्थ जीवन वाखाणण्यासारखे होते. त्या इंद्राचे भेटीचा पांडवांच्या मनोधैर्यावर फार चांगला दुरागामी परिणाम झाला होता. त्यांचा उत्साह वाढला होता.

अशारितीने यक्ष युद्ध पर्वाचा दहावा भाग संपला.

# निवात कवच युद्ध पर्व सुरू

## (भाग अकरावा )

वैशंपायन सांगत असतात, ते झाल्यावर शक्र त्यांच्या ठिकाणी जातात. विभत्सू त्याच्या भावंडाबरोबर आणि त्यांच्या समाईक पत्नी बरोबर युधिष्ठीराची त्या काळातील रिवाजा नुसार प्रार्थना करून त्याचे स्वामित्व स्वीकारण्यात आल्याचे दाखवतात. त्या सगळ्याची कपाळं हुंगून युधिष्ठीर त्यांच्या प्रेमाची दखल आपण घेत आहोत असें दाखवतो. त्या प्रसंगाने उत्तेजित झालेला युधिष्ठीर अर्जुनाला बोलतो, "अरे अर्जुना, आम्हाला ऐकण्याची फार इच्छा आहे, तू तुझे आयुष्य स्वर्गात कसे व्यतीत केलेस? तू शस्त्र कशी मिळवलीस? रुद्राला त्याने कसे मनवले? निरनिराळ्या देवांची कृपा कशा मिळवली? शक्राचे मन कसें जिंकलेस? जी शस्त्र व अस्त्र त्याने मिळवली त्यांचा सराव कसा केला? शंकराचे पिनाक धनुष्य कसे प्राप्त केलेस? त्या देवांची सेवा त्यांने कशी केली? हे सगळे मला सविस्तरपणे समजून घ्यावयाचे आहे".

ते प्रश्न ऐकल्यावर मोठ्या उत्साहात अर्जुन त्यांना सांगतो, "अहो महाराज, मी ते सगळे कसे केले ते सांगतो, ते ऐका. मी कसें इंद्राला व नंतर महादेवाला आपलेसे केले ते सांगतो, असें बोलून तो सुरुवातीपासून सांगू लागतो. तुम्ही दिलेल्या आज्ञेनुसार मी त्या शस्त्रांच्या शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी स्वर्गात गेलो. आपल्या सांगण्यानुसार मी जंगलात तपस्या करण्यासाठी गेलो होतो. कम्यक मधून मी भृगुतुंगाला पोहोचलो. तेथे मी एक रात्र काढली. तेथे व्रतस्थ राहून मी आणखीन कांहीं दिवस तेथे काढले. तेथे एक ब्राह्मण मला भेटला. तो मला विचारतो, अरें कुंतीपुत्रा , तू आता कोठे जात आहेस"? ते ऐकल्यावर मी त्या अनोळखी ब्राह्मणाला माझ्याबद्दलचे सगळे सांगितले. त्यानंतर अरे राजा, माझे ऐकल्यावर तो ब्रह्मण सुखावला असें त्याच्या वागण्यावरून मी समजलो. नंतर तो बोलला, "अहो भरतकुळी सुपुत्रा, असाच तपस्या करत रहा. त्यामुळें थोडक्या काळातच तू इंद्राला भेटशिल. त्या त्याच्या मार्गदर्शनानुसार मी हिमालयात गेलो. तेथे घोर तपस्या करू लागलो. त्या तपस्येत मी पहिला महिना फक्त फळांवर रहात होतो. दुसर्या महीन्यात फक्त पाणी पिऊन रहात होतो. तिसरा महिना मी पूर्ण अनशन करत होतो. चौथ्या महिन्यात मी

माझे दोनही हात वर करून ध्यान करत होतो. विशेष लक्षात घेण्याची बाब अशी किं, एवढे करून मला थकवा किंवा अशक्तपणा वाटत नव्हता. पांचव्या महिन्याच्या पहिल्याच दिवशी मला वराह रुपाचा साक्षात्कार झाला. त्याच्या हालचाली घाबरवणार्या होत्या. त्यानंतर मला दिसले कीं, तो वराह कोणा शिकार्याच्या मागून जात आहे. त्या शिकार्याच्या हातात धनुष्य, बाण, तलवार अशी आयुध होती व त्याच्या बरोबर कांहीं महिला सुद्धा चालत होत्या. ते पाहिल्याने माझ्यातील क्षत्रिय जागृत झाला व मी माझे धनुष्य उचलले व बाण लावून मी त्या शिकार्याच्या व त्याच्या सह असलेल्या स्त्रियांच्या संरक्षणार्थ त्या वराहाला बाण मारला. मी बाण मारल्याचे पाहून त्या शिकार्यानेसुद्धा त्या वराहावर बाण मारले. माझे हात थरथरत होते. तो शिकारी रागांने माझ्याकडे पहात ओरडून बोलतो, "तू शिकारीच्या नियमांचे उल्लंघन कां करत आहेस? ती माझी शिकार आहे. मी त्याला प्रथम मारले होते. जास्त हुशारी करशिल तर तुला ह्या भाल्याने मारून टाकीन. माझ्या शिकारीपासून तू दूर रहा". त्यानंतर तो प्रचंड आकाराचा शिकारी माझ्यावर चाल करून आला. तो माझ्यावर बाणांचा वर्षाव करतो व त्या बाणांच्या पावसाने त्याने मला अडकवून ठेवले. ते पाहिल्यानंतर माझा नाईलाज झाला व मीसुद्धा त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागलो. माझे मंत्राने भारलेले बाण त्याला भेदू लागले जसें इंद्राच्या वज्राने डोंगराला भेदले होते. ते झाल्यावर तो शिकारी ईरेस पेटला व त्याचा बाणांचा मारा कित्येक पट वाढला. त्यांने अनेक शरीरं धारण केली, त्यावर मी त्याच्यावर माझे बाण मारून त्याच्या शरीराला बर्याच जखमा केल्या. आता त्यांने त्याचा आकार लहान केला असां किं, त्याला बाण मारता येऊ नये. तरी त्याचे डोके मोठे होते त्यानंतर त्याने मोठे शरीर व लहान डोके असे विलक्षण रुप घेण्यात सुरुवात केली. पण मी न घाबरता माझ्या स्वसंरक्षणाचे काम चालूच ठेवले. त्यानंतर तो पुनः त्याच्या मुळ स्वरुपात आला. माझे बाण त्याला थांबवू शकले नाहीत. तो खूपच सरस ठरला. मला माझे बाण त्याच्यावर काम करत नाहीत हे पाहून आश्चर्य वाटत होते. मी वायूदेवाचे शस्त्र वापरले होते पण ते त्याच्यावर काम करत नव्हते. सगळेच मला नवल वाटत होते. मी अशी शस्त्र त्याच्यावर फेकली जशी, स्थुनकर्ण, वरुण, शावल इत्यादि पण त्यांचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नव्हता. मग मी माझे धनुष्य बाजूला टाकले व त्याच्यावर चालून गेलो. आता त्याने धनुष्य बाण टाकून दिले व मला कुस्तीचे

आव्हान दिले. मी ते स्वीकारले. आता आमच्या कुस्ती सुरू झाली. प्रथम गुद्दे व नंतर जोरांने चापट्या मारावयाला सुरूवात झाली. त्यातसुद्धा तो मला आटपेना. शेवटी मी थकलो होतो त्या मारामारीत व म्हणून खाली बोहोष होऊन पडलो. ते पाहून तो शिकारी माझ्याकडे पहात हसू लागला व नंतर तो व त्याच्या बरोबर असलेल्या सगळ्या स्त्रिया एकदम अंतर्धान पावल्या. त्यानंतर तो पुनः माझ्यापुढे आला, त्यावेळी त्याच्या अंगावर शिकार्याचे कपडे नव्हते. त्याचे ते कपडे प्रकाशमान होते. आता तो माणूस वाटत नव्हता. तो त्याच्या दैवी रुपात प्रकट झाला होता. तो त्याच्या स्त्री रुपाबरोबर ह्यावेळी प्रकट झाला होता ज्या रुपाला आपण उमा असें म्हणतो. त्याच्या हातात त्याचे पिनाक धनुष्य होते. अंगावर साप फिरत होते, ते साप त्यांचे रुप सतत बदलत होते. बाजूला नंदी उभा होता. अजून तो लढण्याच्याच उद्देशाने माझ्याकडे पहात होता. थोडावेळ माझ्याकडे पाहून नंतर त्याचा चेहरा निवळला व मला म्हणाला, "मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तू माझ्याकडे कांहीं आशिर्वाद मागू शकतोस". त्या नंतर त्यांने गडप केलेले दोन भाते व धनुष्य माझे मला परत केले. आता तो  लढण्याच्या अविर्भावात नव्हता, मैत्रीच्या मनस्थितीत होता. मी खाली पडलो होतो, त्याने मला हात देऊन उठण्यास मदत केली. पुनः तो विलक्षण, मला म्हणला, "मांग माझ्याकडे कांहीं तरी. तुझ्या मनात जे आहे ते बोलून टाक. मी ते तुला देण्यासाठी आलो आहे. फक्त अमरत्व मागू नकोस. तू कशासाठी निघाला आहेस ते सांग". ते ऐकल्यावर माझ्या लक्षात आले कीं, हे महेश्वर आहेत व ही त्यांच्या बाजूला उभी आहे ती उमा आहे व कडेला जो बैल आहे तो नंदी आहे. ती वस्तुस्थिती लक्षात आल्यावर मी भानावर आलो व मला शस्त्र पाहिजेत ज्यांच्या सहायानें मी कौरवांशी लढू शकेन, तेव्हां ठरवले कीं. त्या संदर्भात कांहीं मी शंकराकडे मागितले पाहिजे, ही चांगली संधी आहे. मी ठरवले सगळी शस्त्र विद्या त्यांच्याकडे मागावी. म्हणून मी आदरपूर्वक त्या उभयतांना साष्टांग प्रणिपात केला व म्हणालो, "आपण देण्यास तयार अहात तेव्हां मी आपल्याकडे तुमची सगळी युद्धोपयोगी आयुध व त्यांचे वापरावयाचे तंत्र मागू इच्छितो". ते ऐकल्यावर तो त्र्यैंबक म्हणाला, "मी तुला ती देईन, माझे रुद्रसुद्धा तुला देईन". असें बोलणे झाल्यावर तो महादेव मला त्याचे सर्वात श्रेष्ठ आयुध पशुपत देतो. ते देतांना तो सावधानतेचा इशारा देतो, "हे शस्त्र माणसावर सोडू नकोस. जर ती चुक झाली तर त्याच्या आघाताने सगळी

सृष्टी उध्वस्त होईल. जेव्हां अगदी दुसरा कांहीं इलाज उरला नाही अशी परिस्थिती उत्पन्न झाला तरच हे अखेरचे म्हणून वापर नाहीतर ते कायम राखीव म्हणून ठेव". अशारितीने महादेवांनी मला हे पशुपत शस्त्र दिले. जे कोणालाही आटोक्यात आणता येणारे नव्हते. जे देवांनासुद्धा हाताळता येण्यासारखे सोपे नव्हते. त्याच्या समोर कोणीही राक्षस, असुर, यक्ष टिकू शकणार नव्हता.

त्या नंतर मी त्यांच्या आदेशानुसार तेथे बसलो. आणि माझ्या समक्ष ते तिघे अंतर्धान पावले.

आशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा अकरावा भाग संपला.

## निवात कवच युद्ध पर्व पुढे चालू

## (भाग बारावा )

अर्जुन सांगत असतो, अहो भारत, त्या महादेवाच्या कृपेखाली मी तेथेच रात्र काढली. कारण माझ्यात उठण्याचा त्राण उरला नव्हता. मी पूर्णतया थकलो होतो. दुसर्या दिवशी सकाळी मी माझे प्रातर्विधी उरकल्यानंतर पहातो ते, तो ब्राह्मण माझ्याकडे येतांना मला दिसला. तो भेटल्यावर त्याला जे घडले ते सगळे सांगितले. ते ऐकल्यावर तो ब्राह्मण मला म्हणाला, "आता तू महादेवाला स्वतः भेटला आहेस, ज्याला कोणी पाहू शकत नाही, लवकरच तू इतर लोकपाल ज्यांच्याकडून तुला शस्त्र संपादन करावयाची आहेत, भेटणार आहेस. त्यातील आदितीचा मुलगा वैवस्वात तुला प्रथम भेटेल. इंद्रसुद्धा तुला त्याचे वज्र देईल. आता तुझं काम सोपे झाले आहे. त्यानंतर तो सूर्यासारखा तेजस्वी ब्राह्मण मला आलिंगन देतो व निघून जातो. मी तेथेच होतो व सगळा दिवस तेथेच होतो. मी त्यामुळें ताजा तवाना होत होतो. कांहीं वेळानंतर तेथे मनाला आल्हाद देणारा वारा वाहू लागला होता. तेथील सुंदर सुगंधी फुलं मी पहात होतो. मला इंद्रासाठी गाईलेली वेदातील कवनं ऐकू येऊ लागली. त्या इंद्राच्या पुढे अप्सरा व गंधर्व त्याचे गुणगान करत होते अशा त्या स्वर्गीय रथांचा तांडा तेथे येऊन पोहोचला. त्याच्या बरोबर मरुत होते. महेंद्राचे पाठीराखे होते. त्याच्या सह मरुत्वान व इंद्राची पत्नी साचीसुद्धा होती. ते सगळे ज्या रथांतून येत होते त्यांचे घोडे विलक्षण देखणे होते. तेवढ्या मी त्या देवाला पाहिले ज्याच्या घरी सगळे मेल्यावर जातात, अर्थात् यमदेव तो होता लोकपालातील एक. त्यात वरुण सुद्धा होता, दुसरा लोकपाल. ते सगळे आनंदाने माझे कौतुक करत होते व बोलत होते, "अरे सव्यसाची, आम्हा लोकपालांना पहा, आम्ही तुला भेटण्यास आलो आहोत. तुला शंकराने दर्शन दिले तुला त्याने मिठी मारली जेव्हां तुम्ही कुस्ती करत होता, हे भाग्यवंता, तुला जी शस्त्र पाहिजेत ती आम्ही देण्यासाठी आलो आहोत". मी त्यां सर्वांना लवून नमस्कार करून त्यांना अभिवादन केले. त्या सगळ्यांना मला त्यांची आयुध दिली कारण ते सांगत होते, कौरवांशी लढाई हि माणसातील जरी दिसण्यात असली तरी ती प्रत्यक्षतः देव आणि असुरांची लढाई होणार आहे. फक्त माणसाच्या अवतारात ते होणार आहे. त्यानंतर त्या

सर्वांनी मला त्यांच्यातला एक असें समजण्यास सुरुवात केली. त्यांच्यात मेघावत त्याच्या रथातून आला होता. तो मला बोलला, "अरे फाल्गुना, तुला आता आमच्या स्वर्गात रहावयाला यावे लागेल. तुझ्या येण्या आधीपासूनच मला माहीत होते किं, तू आमच्यात येणार आहेस. मी माला तुझ्यात पहात आहे कारण तू माझा अंश आहेस. तू आधी देवांना अर्घ्य दिले आहेस व आता मोठी तपस्या केली आहेस त्यामुळें तू स्वर्गात रहाण्यासाठी योग्य झाला आहेस. तरीसुद्धा तुला आणखीन तपोश्चरण करावे लागेल. कारण तू अजून मृत झालेला नाहीस. माझ्या आज्ञेने माझा रथीचा चालक मताली तुला स्वर्गात फेरफटका मारून आणिल". ते ऐकल्यावर मी शक्रला बोललो, "अहो पवित्र, आपल्या कृपेमुळें मी धन्य झालो आहे. मी आपल्याला माझे येथील गुरू समजतो". ते ऐकल्यावर इंद्र मला म्हणाले, "अरे माझ्या मुला, ती शस्त्रं तू चालवण्यास शिकल्यावर तुझ्या कडून मोठी कामगिरी होणार आहे. त्यासाठीच तर तू ती शस्त्र आमच्याकडे मागत आहेस. तशी तुला ती आता मिळालीसुद्धा आहेत".

ते ऐकून मी त्यांना बोललो, "अहो शत्रूघ्न, मी आपल्याला आश्वासन देतो कीं, जोवर माझी शस्त्र कामयाब होत आहेत, मी ही आयुध माणसांवर वापरणार नाही. अगदी नाइलाज झाला तरच ती मी वापरणार आहे. म्हणून मला ती शस्त्र द्या म्हणजे मी स्वर्गात येऊ शकेन. ते ऐकून इंद्र मला सांगतो, "अरे धनंजया, वायू, अग्नी, वसु, वरुण, मरुत आणि सिद्धांची अशी सगळी शस्त्रे शिकून घे". त्याशिवाय ब्रह्माची, गंधर्वांची, उरुगांची, राक्षसांची, विष्णूची अशी सगळी अस्त्र, शस्त्र आयुध तू आता शिकणार आहेस त्याला वेळ लागणार आहे. त्याशिवाय माझ्याकडे असलेली शस्त्र सुद्धा मी तुला शिकवणार आहे जी पृथ्वीवर वापरली जात नाहीत". एवढे बोलल्यावर शक्र अंतर्धान पावला. थोड्या वेळांनी एक सुंदर रथ माझ्याकडे आला. त्याची चालक होता मताली. तो इंद्राचा खास रथ होता. त्याचे काय वर्णन मी करू. मताली मला म्हणाला, "अहो भाग्यवान, देवांचे देव तुम्हाला स्वर्गाची सैर करून दाखवण्याचे सांगत आहेत, तरी तुम्ही रथात चढा. स्वर्गात तुम्हाला बरेच कांहीं शिकावयाचे आहे. त्यानंतर तुम्ही तुमचे पृथ्वीवरील कार्य व्यवस्थितपणे करू शकाल. आता तुम्ही माझ्या बरोबर स्वर्गात फेरफटका मारणार आहोत. तुमच्या ह्या शरीराने मी तुम्हाला स्वर्गात सदेह नेणार आहे व तेथे तुम्ही असेंच सदेह रहाणार अहात. देवांच्या

राजाच्या मर्जीने ते शक्य होणार आहे". त्यांनतर तो मताली मला रथात चढण्यास सांगतो. आमचा रथ मी चढल्यावर हिमालयाला एक चक्कर मारतो व थेट स्वर्गाच्या दिशेने निघून जातो. तो रथ विचारांच्या वेगांने प्रवास करत असतो. थोडा प्रवास झाल्यावर मताली माझ्याकडे वळून पहातो व स्मित करत बोलतो कीं, तुझे रथात बसणे कौतुकास्पद आहे कारण, जेव्हां रथ पहिला वेग घेतो तेव्हां शक्रसुद्धा त्याच्या पहिल्या हिसक्याने हलतात पण तू अजिबात न हलता बसला आहेस. असें कधी आधी झालेले नाही. त्यामुळे मला असे वाटते तुमच्यात इंद्रापेक्षा जास्त सामर्थ्य असले पाहिजे. ते बोलल्यानंतर मतालीने रथ उंच नभात नेला. इतके वर नेला किं त्या उंचीवरून आम्ही स्वर्गातील विविध जागा एकादा नकाशा पहावा अशा प्रकारे पाहू शकत होतो. त्या उंचीवरून इंद्राची सगळी राजधानी दिसत होती. त्यांत सिद्धांचे, गंधर्वांचे व अप्सरांचे वाडे दिसत होते. जरी त्या सगळ्या जागा एकमेकांपासून बर्याच अंतरावर होत्या त्या उंचीवरून ते एकमेकांच्या फार जवळ आहेत असे वाटत होते. त्यानंतर वरून मी शक्राचा वाडा पाहिला. मतालीने रथ आणखीन वर नेला. तेथे अधांतरी तरंगत बसलेले साध्य, रथ पाहिल्यावर त्याला वंदन करू लागले. त्यावेळी रथ स्वर्गातील नंदनवन ह्या ख्यातनाम उद्यानावरून जात होता. ते नंदनवन फार विस्तीर्ण पसरलेले होते असें जांणवले. त्या उंचीवरूनसुद्धा ते चौफेर अथांग पसरलेले असें दिसत होते. त्याच्या नंतर इंद्राची नगरी अमरावती दिसू लागली. त्याच्या बांधण्यात असंख्य मौल्यवान रत्न वापरलेली असल्यामुळें जसें आकाशात तारका रात्री लुकलुकतात तशी ती रत्नं चमकत होती. त्या उंचीवर मला सूर्याच्या उन्हाचा त्रास होत नव्हता. तेथे न थंडी होती वा उष्णता होती. मला सांगितले मतालीने कीं, स्वर्गात आनंद किंवा दुःख ही दोनही जाणवत नाहीत. तेथे गरीबी अथवा श्रीमंती असे भेदसुद्धा नसतात. तेथे सगळें सारखेच असतात. तेथे लोकांना थकवा वाटत नाही. तेथे कोणी रागवत नाही किंवा नाराज होत नाही. कोणी स्वताची तुलना दुसर्याशी करत नाहीत, जे पापाचे मूळ कारण असते. जो तो आपापल्यात मग्न रहाणे पसंत करतो. त्यामुळें नसते वाद विवाद स्वर्गात नसतात व पाप तेथे होत नाही. तेथील लोक आत्मसंतुष्ट असतात. मताली मला ते सांगत होता. पृथ्वी व स्वर्गात नेमका फरक काय असें मी विचारले तेव्हां त्याने हे मला सांगितले. स्वर्गातील झाडांना नेहमीच फुलं व फळं येत असतात. तेथील सरोवरात सुंदर

कमळ नेहमीच उमलत असतात. स्वर्गातील हवा प्रसन्न करणारी, शितल, सुगंधी असते. तेथील हवेत धूळ नसते. त्यातील मातीत विविध प्रकारचे मौल्यवान खडे पृथ्वीवर जसें दगडाचे खडे आढळतात तसे असतात. स्वर्गात कांहीं अजब दिसणारे पशु आणि त्याच्या आकाशात तसेंच विलक्षण पक्षी दिसत होते. पृथ्वीवर सगळे कांहीं जमिनीवर स्थाईक असते तसे स्वर्गात नसते. तेथे कित्येक जण आकाशात अधांतरी तरंगणार्या घरात रहात असतात. कांहीं तेथील पाण्यात रहात असतात. त्यामध्ये गंधर्व आणि अप्सरा जास्त होते. तेथे कोणी कांहीं बनवत नाही कारण केवळ इच्छा केली कीं ते मिळत असते. तेथील लोकांची इच्छाशक्ती विलक्षण प्रबळ असते. तेथे मी मरुत, आदित्य, अश्विन, बरेच वसु, बरेच रुद्र, साध्य अधांतरी रहात असतात त्यांना पाहिले. मी त्यांच्या वस्त्यांतून रथ जात असतांना त्यांची हात जोडून पुजा मनाने केली. ते मला दुवा देत होते व मला सदैव विजय प्राप्त होवो असे बोलत होते. अखेरीस आमचा तो प्रवास संपला व मी त्या हजार नेत्र असलेल्या देवांच्या राजापुढे हात जोडून उभा राहिलो. इंद्राने मला बसण्यासाठी त्यांच्याच आसनात जागा दिली. त्यानंतर तो वसवा मला स्पर्श करतो. मला जी आयुध मिळाली होती त्यांचे प्रशिक्षण आता मला स्वतालाच करावयाचे होते कारण ती शस्त्र दुसरा कोणी शिकवू शकत नव्हता. अशारितीने मी स्वर्गात देव आणि गंधर्वांच्या सानिध्यात स्थाईक झालो माझ्या भांवांनो. अर्जुनाने त्याचे पहिले विवेचन पूर्ण केले. त्यानंतर तो थोडी विश्रांती घेऊन पुनः सांगू लागला, अदिताचा मुलगा विवस्वान त्याचा मुलगा चित्रसेन ह्याची नेमणूक मला मदत करण्यासाठी केली गेली. त्यामुळें स्वर्गात काय व कसे करावयाचे त्याचे शिष्टाचार असें सगळे तो मला शिकवत होता त्यामुळें माझे तेथे रहाणे सोपे झाले. त्याने मला संपूर्ण गंधर्व विद्या शिकवली. माझे शक्राच्या घरातील रहाणे मजेचे होते. माझ्या सगळ्या गरजा तेथे माझ्या मना प्रमाणे पूर्ण होत होत्या. दिवसभर शस्त्रांचा सराव करावे व संध्याकाळी गंधर्वांचे संगीत ऐकावयाचे असा माझा रोजचा कार्यक्रम होता. तेथे मी थोडेफार संगीतसुद्धा गंमत म्हणून शिकलो. परंतु, माझे प्रथम लक्ष होते त्या शस्त्रांची सराव करण्यावर. त्यात कधी खंड पडला नाही. इंद्राला माझी प्रगती पाहून समाधान होत होते. माझे एकचित्ताने काम करणे त्याला विशेष आवडत असें. अशारितीने माझे जीवन स्वर्गात होते. जेव्हां मी सगळ्या शस्त्रांच्यात प्रावीण्य संपादन केले तेव्हां तो शक्र, ज्याचा उच्चैश्रव

घोडा आवडीचे वाहन होते, माझ्या पाठीवर प्रेमाने हात फिरवून त्याचे समाधान व्यक्त करत असें. तो एकदा म्हणाला कीं, "आता तू अशाप्रकारे तयार झाला आहेस कीं, स्वर्गाचे योद्धेसुद्धा तुला पराजीत करू शकणार नाहीत. मग पृथ्वीच्या मर्त्य लोकांची काय कथा". असें तो वारंवार बोलत असें त्यामुळें माझा उत्साह अनेक पटीने वाढत असें. पुढे ते बोलले, त्यांना आश्चर्य वाटते कीं, कोणी मर्त्य अशा प्रकारे ह्या आयुधात प्रवीण होऊ शकतो त्याचे. ते पुढे सांगत होते, कीं, मी इतका तयार आहे किं, त्यांनासुद्धा माझी भिती वाटू लागली आहे. ते पुढे माझे कौतुक करतांना म्हणाले तुझ्या ह्या सामर्थ्याचा उपयोग मी पृथ्वीवरील सज्जन प्रजेच्या व ब्राह्मणांच्या संरक्षणासाठीच फक्त केला पाहिजे. मला जर मोह झाला तर माझे राक्षसात रुपांतर होण्याची भिती त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले कीं, मी त्यासाठी सदैव तुझ्या म्हणजे युधिष्ठीराच्या आज्ञेतच राहिले पाहिजे. हे बोलत असतांना त्यांच्या अंगावर काटा उभा राहिल्यासारखे दिसत होते. त्या आयुधांच्या प्रवीणते बरोबर तुला सात्त्विकता, संयम, क्षमाशिलता, मर्यादा, न्याय निष्ठूरता असें गुण अंगिकारावे लागतील तरच ही आयुधं दैवी कामासाठी वापरली असें होईल. ती शस्त्र कशी फेकावयाची व कशी आवरावयाची, कशी परत बोलवावयाची असें सगळे तू शिकले पाहिजेस म्हणजे त्यांचा उपयोग सत्यासाठी (परमेश्वराच्या कार्यासाठी) होईल. ह्या आयुधांच्या वापरामुळें जे पाप अनवधानाने घडणे अपरिहार्य असते त्याचे प्रायश्चित्त कसे करावयाचे तेसुद्धा तू शिकून घे. अशा भयंकर आयुधांच्या संदर्भात जे कांहीं होणे शक्य असते त्या सगळ्या परिस्थितींचा तुला अभ्यास करावा लागेल. तुला माहीत आहे किं, ह्या आयुधांचे शिक्षण घेण्यासाठी तुला दक्षिणा मला द्यावी लागेल त्याबद्दलचे तुला सांगेन त्याप्रमाणे सगळे तू करशिल म्हणजे तुला कांहींही त्रास होणार नाही. ते ऐकल्यावर मी इंद्राला सांगितले कीं, मी त्यासाठी नेहमी तयार आहे. तो म्हणाला तसे असेल तर तू आधीच सगळे मिळवले आहेस असें समज. त्यानंतर इंद्र अर्जुनाला दक्षिणा काय ते सांगतो. तो बोलतो, "माझे शत्रू दानव आहेत. ते खोल समुद्रात रहातात. त्याचे नांव आहे निवात कवच, त्याच्या बद्दल तुला माहीती सांगतो ती ऐक, ते एकंदर तीनशे लक्ष एवढे आहेत. ते सगळे सारखेच दिसतात व त्यांची ताकद अगम्य आहे. तू त्यांना ठार मारशिल म्हणजे मला माझी दक्षिणा मिळेल". एवढे सांगितल्या नंतर शक्राने मला एक दैवी रथ दिला. त्याचे चालक मतालीचा

मुलगा होते. त्या रथाचा रंग मोरपिशी होता. त्यानंतर त्याना माझ्या शिरावर एक विलक्षण असें जिरोटोप घालण्यासाठी दिले. अंगावर विशिष्ट प्रकारचे चिलखत नेसण्यास दिले. जसे तो इंद्र स्वतः घालून होता. ते चिलखत अभेद्य होते. तरी स्पर्श केला तर ते सुसह्य होते. मी गांडीव घेतले, त्याची दोर लावली. नंतर त्या मोरपिशी रंगाच्या रथात चढलो. त्या रथातून जातच शक्राने विरोचनाच्या मुलांचे, वलीचे पारिपत्य केले होते, आता त्या रथातून मी त्या दानवांचा नाश करण्यासाठी निघालो होतो. त्यानंतर रथ सुरू केला होता. त्याच्या आवाजाने सगळे दणाणून गेले. ते पाहून सगळे देव तेथे जमा झाले, काय होत आहे ते पहाण्यासाठी. माझा रुबाब असा होता किं, मी दुसरा इंद्र असावा. मला निरोप देतांना तो स्वर्गाचा राजा मला पुनः विचारतो, "अरे जिश्नु, तुला माहीत आहे नां तू काय करावयाचे आहे"? मी त्याला चटकन उत्तर दिले, "मी आता निघालो आहे निवात कवच दानवांचा नाश करण्यासाठी, मला तुमचे आशिर्वाद द्या". ते ऐकल्यावर तो देवांचा राजा, पुरंदर, माझी स्तुती करू लागला जशी आपण देवांची करतो. कारण जसें देव स्तुतीने संतुष्ट होतात व मदत करतात तसा मी संतुष्ट होऊन त्यांचे काम करावे. त्या रथाने चाल करून मेघावताने अति प्राचीन काळी संवर, नमुची, वल, वृत्र, प्रह्लाद आणि नरक अशा असुरांचा पाडाव केला होता, असंख्य दैत्यांचा पराभव केला होता, तसेंच मी कौंतेयाने माझी नव्याने मिळवलेली विद्या वापरून निवात कवचांचा पराभव करावा अशी ती स्तुती होती. तो पुढे मला सांगत होता, माझ्याकडे उत्तम दारुगोळा आहे, त्याचा वापर करून मला त्या दानवांना मारणे अवघड जाणार नाही. इंद्राने ह्या सामुग्रीनेच जग जिंकले होते. त्या प्रकारे सगळे देव माझी स्तुती करत राहिले. त्यानंतर त्याने तो दारुगोळा, ज्याचे नांव होते देवदत्त, मला दिले, मी ते घेतले. त्या नवीन शस्त्रां बरोबर माझी नेहमीची आयुधं होतीच, त्या भयंकर दानवांचे पारिपत्य करण्यासाठी निघालो.

अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा तेरावा भाग संपला.

## निवात  कवच युद्ध पर्व
## (भाग चौदावा )

अर्जुन पुढे सांगत असतो, त्यानंतर महर्षी माझी स्तुती करत होते, तो विधी उरकल्यावर मी सागरावर त्या रथांने गेलो. मी तो अथांग सागर पाहिला. त्याच्या उंच उंच लाटा ज्या एकाद्या उंच मनोर्या सारख्या वाटत होत्या त्या मी पहात होतो. त्यांचे एकमेकावर आदळणे व पुनः पसरणे असे होत होते. त्या पाण्यात विविध आकाराचे मासे, कासवं पोहोत होती. मधूनच मगरी त्यांची डोकी वर करून आजुबाजूचे पहात होते. असंख्य शंखू पाण्यावर तरंगतांना दिसत होते. ते पहात असतांना वादळी वारा जोराने पाहू लागला. त्या सागरावरून जातांना मला एक नगरी दिसली ती दानवांची होती. त्यात बरेच दानव रहात होते. मताली मला म्हणाला कीं, आता आपल्याला पाण्यात शिरावयाचे आहे. एक मुसुंडी मारून आपण त्या रथानेच खोल पाण्यात जाणार आहोत. त्याच्या आवाजाने त्या छोट्या शहरातील दानव सावध झाले. त्या रथाच्या धसक्याने त्या दानवांना वाटले किं, साक्षात इंद्रदेव तेथे आले आहेत. ते बेचैन झाल्यासारखे दिसले. ते त्यांची हत्यारे भाले, बरच्या, कुर्हाडी, सोटे असें सगळे घेऊन लढण्यासाठी सज्ज झालेले दिसले. त्यातील कांहींनी त्यांच्या घरांचे दरवाजे बंद करून घेतले. मी माझे चिलखत देवदत्त घालून त्या शहराला अनेक घिरट्या घातल्या. मला त्याची खूप मजा वाटली. त्या फिरण्यामपळें जो आवाज होत होता त्याने सगळे आकाश दणाणून निघाले होते. ते दानव जरी घाबरलेले दिसत होते, त्यांच्या संरक्षणासाठी तयार होत होते. एकेक करून त्यांची संख्या वाढत होती. कांहीं बारके लपून बसण्याच्या तयारीत दिसत होते. त्या सगळ्यांच्या अंगावर किमती दागिने होते. ती दितीची मुलं निवात कवच आता मोठ्या संख्येने तेथे जमा झाली होती. त्यांच्या अंगावर विविक्ष प्रकारची चिलखतं होती व हातात कितीतरी प्रकारची हत्यारं होती. कांहींच्या हातात लांबच लांब भाले होते तर कांहींच्या हातात कुर्हाडी आणि सोटे होते. कांहींच्या हातात विळे व कोयते होते. कांहींच्या हातात तलवारी होत्या त्याशिवाय कांहीं शतघ्न तयार करून सज्ज झालेले दिसले. मतालीने घिरट्या घालून नेमके कोठे रथ उतरावयाचा ते ठरवले व एके ठिकाणी तो उतरतो. त्याच्या रथाच्या हालचाली इतक्या

झपझप होत होत्या किं, मला कांहीं नीट पहाता येत नव्हते. त्याचे मला आश्चर्य वाटले. त्यानंतर ते निवात कवच दानव त्यांची वाद्ये वाजवू लागले. त्या आवाजाने पाण्यातील असंख्य मांसे, त्यात कांहीं डोंगरा एवढे मोठे होते घाबरून पाण्यात आत पळून गेले. त्यानंतर दानवांची एक फौज माझ्याकडे सरकू लागली. त्यांने त्यांच्या शतघ्नातून असंख्य बाण माझ्यावर सोडण्यास सुरूवात केली. त्यानंतर ते भयंकर युद्ध त्यांच्यात व माझ्यात प्रारंभ झाले. सगळ्या निवात कवचांना ठार मारण्याच्या उद्देशांने मी माझा मारा करत होतो. त्या युद्धात माझ्या बाजूनी देवर्षी व त्यांच्या बाजूनी दानवर्षी त्यांच्या सिद्धी वापरून त्यांच्या त्यांच्या पक्षाची ताकद वाढवण्यास सुरूवात करू लागतात. देवर्षी माझी स्तुती करू लागले जसे ते इंद्राची करत होते. त्या युद्धामागे प्रजापतिची बायको तारा कारण होती.

अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा चौदावा भाग संपला.

# निवात कवच युद्ध पर्व

## (भाग पंधरावा )

पुढे अर्जुन सांगत रहातो, जसे युद्ध जोरात आले त्या दानवांची एक मोठी फौज माझ्यावर तुटून पडली. त्या दानवांनी माझ्या रथाला घेरा घातला. ते जोरांने ओरडत पुढे सरकत होते. त्यांचा जोर घाबरणारा होता. ते भाला फेकून मला मागण्याचा प्रयत्न करत होते. मोठ्या आकाराचे दानव माझ्यावर कुर्हाडी, फरशा व सोटे फेकून मारत होते. त्यांने फेकलेले ते सगळे माझ्या रथावर लागून खाली पडत होते. माझ्या गांडीवाच्या मदतीने मी ते सगळे हल्ले परतवत होतो. युद्ध वाढत होते. माझ्या प्रतिहल्ल्यामुळें ते थोडे पिछाडीला गेले. मतालीने रथाचा वेग वाढवला व त्यांचे हल्ले त्यामुळें कुचकामी ठरत होते. रथाखाली त्यातील कित्येक मारले गेले. दितीची मुलं मारली जात होती. ते अशारितीने शेकड्याने मेले होते. माझ्या मार्यामुळें व रथाच्या गिरक्या घेण्यामुळें मोठ्या संख्येने ते दानव मारले जात होते. त्यांचे रथ सुद्धा माझ्या रथाच्या फटक्याने मोडून गेले होते. त्यांच्या रथाचे घोडे सैरावैरा पळू लागले व त्यामुळें त्यांच्या प्रतिकाराचा वेग कमी झाला. ते फार काळ तसे राहिले नाही. पुन्हा ते दानव नवीन तयारी करून माझ्यावर चाल करून आले. त्यांनी मला अडवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली होती. मला मतालीचे कौतुक वाटत होते. त्याची कसब वाखाणण्या सारखी होती. माझे काम पाहून तो शक्राचा रथचालक सुद्धा खूष झालेला दिसला. त्या युद्धात बरेच दानव मारले गेले व कांहीं युद्धातून माघार घेऊन गेले. ते पळत आहेत असें पाहिल्यावर मी ब्रह्माच्या मंतरलेल्या बाणाने त्यांच्यावर मारा केला त्यामुळें ते जळून जाऊ लागले. त्यामुळें संतापलेले ते पुन्हा एकत्र होऊन माझ्यावर हल्ला करतात. त्यांच्या कडे तलवारी, सोटे व छोटे भाले होते. त्यांच्याशी मुकाबला करण्यासाठी मी मघवान नांवाचे शस्त्र काढले. त्यात जी उर्जा असते त्याच्यापुढे कांहीं टिकू शकत नाही. त्या आयुधामुळें त्या निवात कवच दानवांचे तुकडे होऊन पडू लागले. त्यांची हत्यारे तेथेच पडून राहिली. माझ्या बाणांतून काळ्या मधमाशा निघाव्यात असे होत होते व त्या मार्यामुळें ते दानव ठार होत होते. ते पाहून मताली प्रसन्न झालेला दिसला. तरी ते मोठ्या प्रमाणात माझ्यावर त्यांचे भाले फेकतच होते. माझ्या गांडीवातून निघणारे बाण त्या

भाल्यांचे हवेतच तुकडे करत होते. माझ्या बाणातून निघणार्या ज्वाळामुळें ते भाजून निघत होते. त्या मार्यामुळें त्या निवात कवच दानवांच्यांत गोंधळ उडाला होता. तरी ते त्यांचा मारा करतच होते. ते पुन्हा माझ्यावर चाल करून आले. त्यांचा संख्या इतकी अफाट होती किं, कितीही मारले तरी कमी होत नव्हते. मी एकटाच त्या सगळ्यांशी लढत होतो, हो, ती माझी गुरू दक्षिणा होती. त्या विचांराने मी माझा लढा चालूच ठेवला. तेथे रक्ताचा तलाव झाला होता इतके ते मारले गेले होते. इंद्राचे वज्र मी वापरले होतो त्यामुळें ते फार अस्वस्थ झालेले होते. त्यांचा विरोध कमी झाल्यासारखे मला जाणवत होता. त्यानंतर ते त्यांची भ्रमसिद्धी वापरून लढण्यास सुरूवात करतात.

अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा पंधरावा भाग संपला.

# निवात कवच युद्ध पर्व

## (भाग सोळावा )

अर्जुन पुढे सांगत असतो, निवात कवच त्यांच्या भ्रम सिद्धीने माझ्यावर प्रभाव करण्यास सुरूवात करतात. मोठ्या झाडा सारखे दगड माझ्यावर येत असल्याचे मला भासू लागले. त्यामुळें मी गोंधळून गेलो. कारण प्रत्यक्ष कांहींच होत नव्हते. महेंद्रच्या वज्राने मी ते काल्पनिक धोंडे त्याच प्रकारे फोडून काढले. त्यानंतर त्या दानवांनी माझ्या भोवती आग असल्याचे भ्रम सुरू केले. ते काम करत नाही हे पाहिल्यावर ते पाण्याचा वर्षाव सुरू करतात. एकादा धबधबा असावा असें ते पाणी माझ्यावर येऊन पडत होते. संपूर्ण आकाशातून ते पाणी पडत असल्याचा भास मला वाटावा असें ते होते. चौफेर तो मारा होत होता. त्यात भर म्हणून जोरांने वारा वहात असल्याचा व त्यात त्या दानवांच्या ओरडण्याचा भास मला होत होता, प्रत्यक्षात कांहींच होत नव्हते. परंतु, तो मुसळधार पाऊस पाहून मला थोडी भिती वाटली. ते झाल्यावर मी इंद्राने दिलेले विशोशन नांवाचे आयुध वापरावयाचे ठरवले. त्यामुळें सगळे भ्रम प्रभाव संपुष्टात येतात असें असते. त्याचा वापर केल्यावर माझ्या वरील त्या भ्रमांचा प्रभाव संपला व मला खरे जे आहे ते जाणवू लागले. तो प्रभाव संपुष्टात आल्यानंतर त्यांनी माझ्या भोवती आग पसरल्याचे भ्रम सुरू केले. मला त्या आगीचे चटके बसू लागले. मी त्यावर पाण्याचे अस्त्र चालवले जे अशा भ्रमात वापरावयाचे असते. त्यामुळें ती आग विझली. त्याशिवाय तो वार्याचा भास सुद्धा थांबवला. ते काम करत नाहीत हे पाहिल्यावर ते युद्धासाठी उताविळ झालेले दानव इतर प्रकारे भ्रम सुरू करू लागले. जेणेकरून मी घाबरून जाईन असे त्यांना वाटत होते. त्यानंतर पुन्हा त्यांनी दगडांच्या वर्षावाचा भास माझ्यात उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. त्या सतत होणार्या विविध भासांमुळें माझ्यावर त्यांचा प्रभाव होऊ लागला. मला सभोवर अंधार पसरल्यासारखे वाटू लागले. त्यामुळें माझे घोडे पळाले व माझा रथचालक निष्प्रभ झाला. त्याच्या हातातून चाबूक खाली पडला. मी अस्वस्थ होऊन जोरा जोराने ओरडून त्याला हांका मारू लागलो. तू कोठे आहेस, असें सारखे मी ओरडून विचारत होतो. तसे झाल्यावर माझ्यात भितीने काहून माजवले. मी त्या भितीने अस्वस्थ झालो. त्याच वेळी

त्याचा आवाज मला ऐकू आला. तो बोलला, "अहो पार्थ, अमृत मिळण्यासाठी, अशीच भयंकर लढाई झाली होती देव आणि दानवां, तो लढा मी पाहिलेला आहे, त्याच प्रमाणे, संवराच्या वधाच्या प्रसंगीसुद्धा अशीच धमासान लढाई झाली होती, त्या वेळी मी इंद्रांचा रथचालक होतो, त्याच प्रमाणे, वृत्र आणि विरोचनाच्या वधाच्या वेळी मी ते पहात होतो. अहो पांडव, वल आणि प्रह्लादाच्या पारिपत्याचा सुद्धा मी साक्षिदार होतो. त्या सगळ्या अशाच भयंकर विध्वंसक लढाया होत्या. परंतु त्या वेळी मी अशाप्रकारे भ्रमिष्ट झालो नव्हतो. मी सदैव चांगलाच ध्यान साधून होतो. ह्यावेळी हे असे काय झाले कसे झाले कांहीं समजत नाही". ते ऐकल्यावर मी स्वतःला सावरले व संयमाने निवात कवच दानवांनी पसरवलेल्या त्या भ्रम प्रभावातून बाहेर येण्याचा निश्चय केला. आत्मबळ हे सर्वश्रेष्ठ असते त्याचा प्रत्यय मला तेव्हां आला, युधिष्ठीरा, माझा माझ्या आत्मबळावर पूर्ण विश्वास होता त्याचप्रमाणे माझ्या गांडीवावर सुद्धा होता. त्यानंतर मी प्रती भ्रम उत्पन्न करणारे आयुध उपयोगात आणण्याचे ठरवले. त्याच्या मदतीने त्या दानवांनी पसरवलेल्या भ्रमाचा मोड करण्याचा मी निश्चय केला. त्याच वेळी मताली मला म्हणाला, "कांहीं चिंता करू नका, आपण ह्यातून बाहेर येऊ शकतो". त्याच्या त्या आश्वासनाने मला धीर आला. मी माझ्याकडे देवांकडून संपादन केलेल्या त्या प्रतीभ्रम उत्पन्न करणार्या आयुधाने दानवांवर भ्रम प्रयोग करण्यास सुरूवात केली. त्याचा योग्य प्रभाव दिसून आला. ते दानव अजून त्यांचे भ्रम पसरवण्याचे प्रयत्न चालूच ठेवत होते. मला त्यांनी पसरवलेल्या अंधारातून सगळे दिसू लागले व मी माझ्या आयुधांने पुन्हा हल्ला करण्यास सुरूवात केली. आता त्यांचे भ्रमतंत्र त्यांच्यावर उलटले होते. आता त्यांच्यासाठी अंधार झाला होता. त्यांना कांहीं दिसेनासे झाले असावे असें ते वागत होते. माझ्या भ्रम तंत्रामुळें त्यांना असा भास होऊ लागला कीं ते पाण्यात बुडत आहेत. त्यानंतर मतालीच्या मुलांने पुन्हा रथ पुढे दमटवला. त्यावेळी भयंकर चिडलेले निवात कवच माझ्यावर पुन्हा चालून आले. त्यांना दिसत नसल्यामुळें ते आंधळ्यासारखे वेडेवाकडे चाल करून येत होते, त्या संधीचा फायदा घेऊन मी त्यातील बर्याच जणांना यमाकडे पाठवले. तरीसुद्धा आता निवात कवच अदृष्य होऊन हल्ला करू लागले होते. त्या अवस्थेत माझे भ्रमतंत्र त्यांच्यावर काम करू शकत नव्हते. अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा सोळावा भाग संपला.

# निवात कवच युद्ध पर्व

## (भाग सतरावा )

अर्जुन सांगत होता, दानव स्वतः अदृष्य राहून माझ्यावर व मतालीवर भ्रमतंत्राचा वापर करून युद्ध करत होते. तरीसुद्धा गांडीवातून सुटलेले बाण त्यांची डोकी धडापासून वेगळी करण्यात यशस्वी होत होते. कारण त्या बाणांना दानवांच्या वासाशी मी जोडले होते. जेथे तो दर्प असें तेथे ते बाण जाऊन भेद करत होते. त्यांच्या अदृष्य असण्याने माझ्या बाणांवर कांही परिणाम होत नव्हते. त्यानंतर तो निवात कवच भ्रमतंत्र सोडून त्यांच्या नगरात गेले. जेव्हां ते सगळे पळून गेले व सगळे मला दिसू लागले, मी तेथे मरून पडलेले अगणित दानव मृत होऊन पडलेले पहात होतो. तेथे तुटलेले हात, पाय, डोकी असें पडलेले होते. त्याशिवाय मौल्यवान दागिने, जिरोटोप, चिलखतं विखरून पडलेली होती. ते दानव आता त्या त्यांच्या नगरीतून पृथ्वीच्या पोटात शिरत होते. मी जेव्हां त्यांच्याशी लढत होतो, ते मात्र त्यांची सामुग्री गोळा करत निर्वाणीचे काम करत होते. त्याशिवाय त्यांतील कांहीं माझ्या घोड्यावर दगड फेकून मला थांबवण्याचे काम करत होते. माझ्या भोवती जे मोठे दगड पडत होते त्यामुळें माझ्या रथाभोवती एक डोंगर तयार झाला होता व मी व माझा सारथी रथाबरोबर त्यात बंदिस्त झालो होता. त्या दगडांच्या ढीगार्यातून रथ काढणे मुश्किल झाले होते. त्यामुळें ते आकाशात उडीसुद्धा घेऊ शकत नव्हते. दानवांनी स्वता अदृष्य राहून आमच्यावर आकाशातून दगड फेकण्यास सुरूवात केली. तेवढ्यावर ते थांबले नाहीत तर जमिनीतून त्यांनी माझ्या घोड्यांचे पाय पकडून खेचण्यास सुरूवात केली. त्यामुळें ते त्यांचे पाय हलवू शकत नव्हते. रथाची चाकं सुद्धा त्यांनी जमिनीतून पकडून ठेवली होती. अशारितीने आम्हाला जायबंद केल्यावर ते नव्या जोशात माझ्यावर हल्ला करून आले. त्या दगडाच्या मार्यामुळें मी व माझा रथ त्या मध्यें फसलो होतो. मतालीला समजले किं मी हतबल झालो आहे. ते पाहून तो मला बोलला, "अहो धनंजय, अशा मार्याला घाबरून जाऊ नकोस. ते सगळे खोटे आहे. तू तुझे वज्र काढ व त्याचा वापर सुरू कर". ते ऐकल्यावर मला थोडा धीर आला व मी वज्र काढले मात्र. त्याबरोबर माझे गांडीव घेतले व त्यांच्या मदतीने वज्राचे काटेरी भाले मी त्या दगडांच्या ढीगार्यावर

नेम धरून मारले. ते मंतरलेले होते. त्यामुळें ते बाण त्या सभोवार पसरलेल्या भ्रमाचा मोड करून टाकतात. त्यानंतर ते वज्र त्या निवात कवचांचा प्रचंड प्रमाणात नाश करते. तो दगडांचा ढीग नाहीसा होतो. कारण तो मुळातच नव्हताच. त्या मार्यात प्रचंड आकाराचे दानव कोसळून पडत होते. आता त्यांचा ढीग तयार झाला होता. आमचे घोडे व रथ जमिनीत खेचून नेणार्या दानवांचा त्या वज्राने पाठलाग केला आणि त्यांच्या वर जबरदस्त हल्ला केला त्यामुळें त्यांच्या हातातून ते घोडे व रथ मोकळा झाला. विशेष म्हणजे त्या धुमश्चक्रीत त्या माझ्या घोड्याना व रथाला अजिबात कांहीं इजा झाली नव्हती. त्याचे मला खरोखरच नवल वाटले. ते पाहून माझ्याकडे पहात मताली हसत बोलला, "अहो अर्जुन, देवांनासुद्धा वज्र अशा प्रकारे सोडता आलेले नाही. तुम्ही कमाल केली. तुझ्या धाडसाचे कौतुक केले पाहिजे". जसें ते सगळे दानव मृत झाले त्यांच्या बायका आक्रोश करू लागल्या. करकोचाच्या सारखा त्या ओरडत होत्या. त्याची दखल न घेता आम्ही आता त्या नगरात प्रवेश केला. आमचा मोरपिशी रंग असलेला रथ येतांना पाहून त्या कोठे पसार झाल्या कळले नाही. त्या धावणार्या बायकांचे दागिने खाली पडत होते. त्या घाबरलेल्या बायका त्यांच्या सोन्याच्या घरात शिरल्या. त्या घराच्या बांधकामात रत्न वापरलेली होती. मी ती सोन्याची नगरी पाहून थक्क झालो. स्वर्गापेक्षा ती नगरी जास्त वैभवसंपन्न होती. ते पाहून मी मतालीला विचारले, "देव अशा घरांत कां रहात नाहीत"? मी त्याला म्हणालो, "हे नगर पुरंदराच्या नगरापेक्षा कितीतरी उच्च दर्जाची आहे". ते ऐकल्यावर तो बोलला, फार प्राचीन काळी हे शहर देवांचेच होते. फार प्राचीन काळी झालेल्या युद्धात ह्या निवात कवचांनी देवांना हरवले व त्यांच्या नगरांचा ताबा घेतला. निवात कवच दानव असले तरी मोठे तपस्वी आहेत. फार मोठी तपस्या करून ते ब्रह्माला प्रसन्न करून घेत व त्यामुळें त्यांच्यापुढे देवांचे कांहीं चालत नव्हते. निवात कवच हे दानव ब्रह्माच्या दानु नांवाच्या मुलीची अपत्ये आहेत त्यामुळें प्रजापतिला त्यांच्या बद्दल माया असते, त्याचा ते फायदा घेत असतं. दानु वेळोवेळी त्यांना विशेष अधिकार मिळवून देत असें. दानुची व दितीची मुलं (दैत्य, राक्षस) शीवाची सेवा करत असतात अशा सगळ्या गोष्टींचा त्याना फायदा होत असतो. ब्रह्म व शीव त्यांना खूष होऊन वाटेल तो वर देत असतं. देवांपासून त्यांना अभय असे आशिर्वाद मिळवले आहेत. ते समजल्यावर शक्राने ब्रह्माकडे तक्रार केली. तो ब्रह्माला

बोलला, तूम्ही आमचे हित न पहाता त्यांच्या तपस्येवर संतुष्ट होऊन कांहीं वाटेल तो आशिर्वाद कसा देता"? "त्या आशिर्वादानुसार इंद्राला ह्या दानवांना मारता येत नव्हते पण तू त्यांना मारू शकत होतास कारण तुझ्यापासून ते अभय नव्हते. म्हणून इंद्राने तुला हे करावयाला सांगितले. अरे भरतकुळाच्या सुपुत्रा, तू अगदी योग्य वेळी आलास व त्यांचा पूरता बिमोड केलास. त्या कामासाठीच इंद्राने तुला स्वर्गात रहाण्यास बोलावून तुझी बडदास्त राखली होती. तुझी मर्जी राखली होती व तुझे लाडसुद्धा केले होते. ते काम तू यशस्वी केले आहेस".

अर्जुन पुढे सांगतो, "अशारितीने निवात कवचांचा नाश केल्यानंतर व ती नगरी काबिज केल्यावर मी व मताली दोघे स्वर्गात आमच्या घरी गेलो".

अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा सतरावा भाग संपला.

# निवात कवच युद्ध पर्व

## (भाग अठरावा )

अर्जुन पुढे सांगत असतो, आम्ही परत येत असतांना मी आकाशात अधांतरी अशी एक नगरी पाहिली. ती दुरून पाहू शकलो. मी मतालीला त्या बद्दल विचारले. तो सांगू लागला, ते आकाशात अधांतरी असलेले शहर फार सुंदर आहे. त्यातील झाडांवर रत्न फळासारखी लागतात. त्या नगरात असे सुंदर पक्षी बागडत असतात जसें कोठेही तुम्हाला पहावयास मिळणार नाहीत. ते पक्षी विलक्षण दिसतात व त्यांचे गाणे सुमधूर असते. ते शहर सूर्यासारखे तळपत होते. त्याला चार प्रवेशद्वारं होती. ते दैवी प्रकारचे होते, त्याच्या सारखे कांहींही पृथ्वीवर असणे शक्य नाही. तो पुढे सांगता होता, त्या शहरात रुंद रस्ते आहेत व ठिकठिकाणी कमानी असतात. त्यातील घरे उंच मनोर्यासारखी आहेत. ती एक अभेद्य नगरी आहे. त्याची गोष्ट तुला सांगतो, ते नगर पौम्य आणि कलकंज जातीच्या राक्षसांचे आहे. त्यातील वैभव अवर्णनीय आहे. त्या झाडांना रत्न फळासारखी लटकत असतात. इतके त्याचे वैभव आहे. असें तुला कोठेही मिळणार नाही. त्याशिवाय खाण्याची फळं सुद्धा त्या झाडावर येत असतात. त्या नगरात कोठेही सापडणार नाहीत असे विचित्र प्रकारचे पक्षी आढळतात. त्या शहराचे निवासी राक्षस आहेत व ते तेथे मजेत रहात असतात. अंगावर दागदागिने व गळ्यात माळा घालून ते मिरवत असतात. त्यांना कोणाचेही भय नसते. कारण, त्या शहराची निर्मिती प्रजापतिच्या दोन मुलींनी त्यांच्या अपत्यांसाठी केली आहे. पुलमा आणि कलका अशी त्यांची नांव आहेत. त्या दोघी बहिणांनी हजारो वर्षे कठोर तपोश्वरण केले व ब्रह्माची कृपा मिळवली. त्यानी असा आशिर्वाद मिळवला कीं, त्यांच्या अपत्यांना कोणाचाही त्रास होणार नाही. त्यांना कधी दुर्दैवाला सुद्धा सामोरी जावे लागणार नाही. त्यांना कोणी युद्धात पराजित करू शकणार नाही. देवसुद्धा त्यांच्या वाटेला जाणार नाहीत. इतर प्रजातीचे राक्षस व पनंग सुद्धा त्यांना त्रास देणार नाहीत. त्यांची अपत्ये सदैव सुखात व सुस्थितीत रहातील. त्यांची वस्ती आकाशात स्वर्गासारखी असेल, त्यांना समृद्धी सदैव लाभेल. त्यांना कोणी गंधर्व, महर्षी, यक्ष त्रास देणार नाहीत. अशा मोठा सर्व व्यापक आशिर्वाद त्यांनी त्यांच्या मुलांसाठी

मिळवलेला असल्याने त्या नगरात सदैव आनंदी आनंदच असतो. तो आशिर्वाद सिद्ध व्हावा म्हणून स्वतः ब्रह्मदेवांनी ते शहर त्या दोघींच्या मुलांसाठी उत्पन्न केले आहे. त्यानगरात जगण्यासाठी जरूरी असणार्या सगळ्या चिजा मुबलक प्रमाणात सदैव असतात. कशाची कमी नसते. तेथे कोणाला आजार दुःख पिडा नसतात. त्यांच्या नायकाचे नांव हिरण्यपूर असें आहे. त्या शहराचे निवासी पौम्य व कलकंज जातीचे राक्षस असतात. त्या शहराचे संरक्षण करण्यासाठी बलाढ्य असुरांची नेमणूक केलेली असते. देवांकडून त्यातील कोणीही आजवर मारला गेलेला नाही. त्यामुळें ते सगळे मजेत रहात असतात. ते पूर्ण समाधानी आहेत. फार वर्षापूर्वी ब्रह्माने त्यांचा नाश माणसांच्या हस्ते करावयाचे योजले होते. तू मर्त्य माणूस आहेस व त्या वज्राच्या मदतीने त्या अभेद्य व बलवान अशा कलकंजांचा नाश सहज करू शकशिल.

अर्जुन पुढे सांगत असतो, अहो युधिष्ठीर, मला ते ऐकून गमत वाटली किं, त्या राक्षसांचा नाश देव करू शकणार नाहीत. मी मतालीला बोललो, "चल आपण त्या नगराकडे जाऊ. मी माझ्याकडे असलेल्या आयुधांने त्या, इंद्राचा द्वेष करणार्यांचा, नाश करून टाकतो. असें कोणीही नाही, जे देवांचा मत्सर करतात, त्यांना मी मारू नये". ते माझे ऐकल्यावर मतालीने आमचा रथ त्या हिरण्यपुराच्या नगराकडे वळवला. मला जवळ येतांना पाहून दितीची मुलं त्यांच्या शस्त्रसज्ज पेहेरावानिशी माझ्या रथावर चाल करून आले. ते प्रगत दानव त्यांच्या धाडसाचे प्रदर्शन करू लागले. त्यांनी त्याच्या नगराच्या संरक्षणासाठी त्याच्याकडे असलेल्या हत्यारांनी जसें, भाले, दुधारी तलवारी, सोटे आणि फरशा आमच्यावर चाल केली. ते झाल्यावर मला माझ्या संरक्षणासाठी माझ्या गांडीवातून बाणांचा वर्षाव करावा लागला. तरीसुद्धा त्यांनी माझ्या वाहनाला घेरा टाकला. तरी माझा हल्ला जोरात चालू होता. ते पाहिल्यावर ते राक्षस ज्यांना युद्धाचा सराव नव्हता पळून जाऊ लागले. ते गोंधळून गेले दिसले. त्यांच्या घाई गर्दीत ते एकमेकांवर आदळून त्या धक्क्याने खाली कोसळत होते. माझ्या कडील आग ओकणार्या बाणांनी मी त्यांतील बर्याच दानवांची डोकी उडवली. माझ्या अशा अचानक झालेल्या हल्ल्याने अस्वस्थ झालेले दानव त्यांचे शहर उंच आकाशात उडवतात. जेणेकरून ते माझ्यापासून दूर जातील. त्यांना त्यांच्या नेहमीच्या भ्रम तंत्राचा वापर माझ्यावर करण्यास सुरूवात केली. ते

उंच आकाशात दूर जात आहेत माझ्या रथापासून ते पाहिल्यावर मी माझ्या गांडीवातून जोराने बाणांचा वर्षाव करण्यास सुरूवात केली. त्यामुळें त्यांचे नभात आणखीन उंच जाणे थांबले. त्यांना मिळालेल्या ब्रह्माच्या आशिर्वादामुळें ते तेथे सुरक्षित झाले. ते शहर कोठेही जाऊ शकत होते, त्याचा पाठलाग करणे माझ्या रथाला शक्य नव्हते. ते पृथ्वीत मातीत घुसले व त्यानंतर तेथून ते पाण्यात बुडाले असे करणे माझ्या रथाला शक्य नव्हते. तरीसुद्धा त्या इंद्राच्या अमरावतीसारख्या दिसणार्या नगरावर हल्ला करतच होतो. माझ्या तशा सततच्या मार्यापुढे ते टिकाव धरू शकले नाहीत व त्यांचे शहर पृथ्वीवर जाऊन कोसळले. त्यांच्या दैवाच्या रतीनुसार ते माझ्या कडून मार खात होते. त्यांनी त्यांची गिधाड पक्षासारखी दिसणारी विमानं बाहेर काढली. माझ्या बाणांपुढे ते फार काळ टिकू शकले नाहीत. ती साठ हजार विमान एका मागोमाग एक अशी पृथ्वीवर कोसळू लागली. मी ती सगळी विमान नष्ट केली. परंतु, मला  समजले कीं, ते राक्षस माणसाकडून मारले जाणे शक्य नाही. सागराला जशी भरती येते तसें ते पुन्हा चढाई करण्याच्या तयारीला लागले. माझ्यावर त्यांची राक्षसी आयुधा त्यांनी नेम धरून ठेवलेली होती. मीसुद्धा त्यांच्या हल्ल्याला प्रतिसाद देण्याच्या तयारीत राहिलो होतो. अक्षरशः हजारांच्या संख्येने ते अजिंक्य राक्षस त्यांच्या सजवलेल्या गाड्यांतून माझ्या दिशेने येत होते. त्यांची युद्धाची तयारी व त्यांच्याकडे असलेली अजब दिसणारी आयुध पाहून माझी चांगलीच करमणूक होत होती. त्यांच्या अंगावरील दागिने माझे विशेष लक्ष वेधत होते. माझे बाण त्यांच्यावर जाऊ शकत नव्हते व त्यांचे आक्रमण मात्र वाढत होते. ते समजल्यावर मी थोडा घाबरलो. ते मला घाबरवण्याचेच काम करत होते असें मला वाटले कारण, तेसुद्धा माझ्यावर हल्ला करत नव्हते, नुसता मला गराडा घालून होते. मी रुद्राला विनवणी करू लागलो. माझी प्रार्थना रुद्राने ऐकली असावी कारण मला एक तीन डोकी असलेला माणूस दिसू लागला, त्याला सहा हात होते, त्याच्या अंगावर साप फिरत होते, त्याचे केस म्हणजे साक्षात अग्नीच्या ज्वाळा असाव्यात अशा होत्या. तो मला बोलला, माझे रुद्र नावांचे शस्त्र आहे ते नेम धरून त्या जमलेल्या राक्षसांवर सोड. मी शंकराचे स्मरण करून ते आयुध नेम धरून त्या राक्षसांच्या सैन्यावर सोडले. त्या रुद्राने ते सगळे राक्षस ठार मारले गेले. पण ते होतांना मला विलक्षण अनुभव आले, ते सांगतो. मला हजारो हरणं, सिंह, वाघ, अस्वलं,

रेडे, सर्प, नाग, गुरंढोरं, हत्ती, मांकडं, डुक्करं, मांजरं, कुत्री, भुरूंद, गिधाडं, गरूड, चमर, चित्ते, मांसे, पक्षी, घोडे, पहाड, नद्या, अरण्ये, समुद्र दिसू लागले त्याशिवाय मला समजणार नाही अशा विचित्र स्वरुपाच्या आकृती माझ्यापुढे नाचत होत्या. पूर्वी घडून गेलेल्या गोष्टी मला तेथे दिसत होत्या जणू मी त्या काळात गेलो आहे. त्याचा अर्थ मला असा जाणवला किं, ते राक्षस अशा विविध रुपात पृथ्वीवर वावरत असतं. हे ज्ञान मला कसे झाले ते मी अहो युधिष्ठीर, तुम्हाला सांगू शकणार नाही. पण आपल्या भोवती राक्षस, दानव अशा विविध रुपांत असतात असें मी समजलो. कांहींना दोन डोकी, कांहींना तीन डोकी कांहींना त्याहूनही जास्त डोकी, अनेक हात असे माणसासारखे वाटणारे पण माणूस निश्चितपणे नाहीत असें मला भासत होते. त्यांचा मृत्यू हा आपल्या मृत्यूसारखा तात्पुरताच असतो. ते पुनः वेगळ्या अवतारात येणार असें विधीचे नियोजन आहे. त्याशिवाय कांहीं ऋषी, गंधर्व, यक्ष, गुह्यक, पिशाच्च, देवांचा द्वेष करणारे असुर, माझे ते कृत्य साक्षिदाराप्रमाणे पहात होते असेसुद्धा मला जाणवले. त्या क्षणी मला समजले अरें युधिष्ठारा, माझ्या भावा, आपण कधीही एकटे नसतो, आपल्यावर पाळत ठेवून कांहीं शक्ति ज्या अदृष्य सृष्टीतील असाव्यात, असतात. आपल्या प्रत्येक कृत्याची नोंद होत असते. ह्या जाणीवेने मला भिती वाटली. असा अनुभव मला ह्या आधी कधी आला नव्हता. ते पहात असतांना मी त्याच वेळी उत्फूर्तपणे त्या दानवांची कत्तल सुद्धा करत होतो. जणू काय, कोणी माझा उपयोग करून त्या हत्या करत होते.

पुन्हा त्यांचा आकाशातून मारा माझ्यावर सुरू झाला. त्यांना आवरणे मला एकट्याला शक्य नव्हते म्हणून मी त्रिपुराचा वध करणार्या देवाला मदत करण्याची विनंती केली. त्यांने माझे ऐकले व तो मारा उलटवला. पुन्हा मी गांडीवाने बाणांचा वर्षाव सुरू केला. ते पाहून मताली फारच खूष झाला होता.

माझे तो सारथी कौतुक करत होता. त्यामुळें मला आणखीन जोर आला होता. तो म्हणाला अशाप्रकारे देवसुद्धा राक्षसांशी लढू शकत नाहीत. तो म्हणाला इंद्र स्वतः अशाप्रकारे हल्ला करू शकत नाही. तो म्हणाला हि आकाशातील नगरी जी देवांना आटपत नव्हती, तू एका हाताने संपवलीस हे मोठेच काम आहे. राक्षसांच्या नगरांचा नाश करणारा म्हणून इंद्राचे नांव पुरंदर असें झाले परंतु, तुझे काम त्याहूनही चांगले झाले आहे असे तो

माझी तारीफ करतांना म्हणाला. मला त्यामुळें हुरूप आला. तू प्रतिपुरंदर झाला आहेस असें मताली मला म्हणाला.
त्या दानवांच्या बायका बाहेर आल्या व आक्रोश करू लागल्या. त्याचा आवाज कुरारी पक्षाच्या ओरडण्यासारखा मला वाटला. त्या बायकांचे केस विस्फारलेले होते व त्या छाती बडवत होत्या. त्या बायकांना त्यांचे दागिने, माळा काढून फेकून दिल्या. त्यांना त्या संहारामुळें किती दुःख झाले ते मी समजू शकत होतो. त्यांचे रडणे ऐकून मला वाईट वाटले. गंधर्वांच्या नगरासारखी दिसणारी ती नगरी शोकाकूल झाली होती. ब्रह्माच्या आशिर्वाद असून सुद्धा त्यांचा नाश झाला होता. मी कारण मात्र आहे व विधीलेख मला वापरत आहे हे मला जाणवले. ती शोकांत बुडालेली नगरी जी मला एकदा सुंदर वाटली ती आता सुंदर वाटेनाशी झाली. त्यानंतर ती नगरी जी ब्रह्मांने त्या राक्षसांसाठी उभी केली होती अचानकपणे माझ्या समोर गायब झाली. जसे आकाशातील ढगं आकाशात विरघळून जातात तसे कांहींसे झाले.
आम्ही आमचे काम केले होते तेव्हां, आता मतालीने आमचा रथ घराकडे वळवला. हिरण्यपुराचा व त्याआधी निवात कवचांचा नाश करून आम्ही परतत होतो. मी इंद्राला भेटलो. माझ्या सारथ्याने जे घडले ते तसें इत्तंभूत इंद्राला सांगितले. मी फक्त तेथे त्याच्यापुढे उभा होतो. ते ऐकल्यावर इंद्राला किती हर्ष झाला ते मी तुम्हाला वर्णन करून सांगू शकणार नाही. इंद्र बोलले, "शाब्बास, चांगली कामगिरी केलीस". त्यानंतर माझे कौतुक तो करत राहिला. मी अशा राक्षसांचा पराभव केला होता जे देवांनासुद्धा अशक्यप्राय होते. ते नंतर म्हणाले, "पार्था, तू माझ्या शत्रूंचा नाश करून माझी दक्षिणा पूर्णपणे दिलेली आहेस. तू ह्यापुढे सुद्धा असाच अजिंक्य रहाशिल. लढताना भावनाविवश न होता केवळ एक कर्तव्य म्हणून तू मारत होतास ते मला विशेष भावले. अशाच प्रकारे तू तुझी मनस्थिती राखून ह्यापुढच्या लढाया करत जा. शत्रूंचा द्वेष न करतां केवळ एक कर्तव्य म्हणून त्यांचा नाश करणे हेंच खर्या क्षत्रियाचे लक्षण आहे. तसे करत राहिलास तर देव, राक्षस, यक्ष, असुर, गंधर्व ह्यांपैकी कोणीही तुझ्यापुढे टिकाव धरणार नाहीत. अरे कौंतेया, तुझ्या अशा पराक्रमामुळें तुझा भाऊ युधिष्ठीर पृथ्वीचा राजा होईल".
अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा अठरावा भाग संपला.

# निवात कवच युद्ध पर्व

## (भाग एकोणीसावा )

अर्जुन पुढे सांगत असतो, इंद्र पुढे मला बोलले, धनंजया, सगळी दैवी आयुधं तुला वापरता येतील. त्यांच्या मुळें पृथ्वीवरील कोणीही तुझ्यापुढे मुकाबला करू शकणार नाही. तू जेव्हां कौरवांशी लढशिल तेव्हां भिष्म, द्रोण, कृप, कर्ण, शकुनी असें कोणीही क्षत्रिय तुझ्यापुढे उभे राहू शकणार नाहीत. ते सगळे मिळून तुझ्या एकसष्टांश इतके ठरतील. त्यानंतर त्याने स्वताच्या हाताने हा सोन्याचा हार माझ्या गळ्यात घातला. त्याचे देवदत्त त्याने मला दिले. तो म्हणाला, ते तू अंगात घातलेस तर तुला कशाचाच त्रास होणार नाही. त्यानंतर त्याने माझ्या शिरावर तो अभेद्य जिरोटोप घातला. मग त्याने मला दैवी दागिने, आभूषणे, स्वतः नेसवली. तो माझा महत्वपूर्ण सन्मान होता. त्यानंतर मी मजेत स्वर्गात राहू लागलो. गंधर्वांची मुलं माझ्या सोबतीला होती. ते सगळे देव मला त्यांच्यातील एक असेंच वागवू लागले. कांहीं काळानंतर तो मला म्हणाला, "अरे अर्जुना, तुझे बांधव तुझी प्रतिक्षा करत आहेत म्हणून आता तू परत जाणे उचीत ठरते". त्या द्युताच्या दुःखदायक अनुभवानंतर मी तुम्हाला सोडून शस्त्र मिळवण्यासाठी पांच वर्षापूर्वी गेलो होतो. तेथे पांच वर्षे राहून सर्व शस्त्रविद्या शिकून घेतली, तो आता तुमच्यात पुन्हा येत आहे. येथे गंधमाधनाच्या पर्वतावर आपण भेटत आहोत.

युधिष्टीर त्याला बोलतो, अरे धनंजया, तू सगळी आयुध प्राप्त केली आहेस हे चांगले झाले आहे. तुझ्यावर तो देवांचा राजा प्रसन्न आहे हे मोठे भाग्य आहे. स्थानु तुला भेटले व तू त्यांना मिठी मारलीस, कुस्तीच्या निमित्ताने, हेसुद्धा परम भाग्याच आहे. ते तुला राक्षसांशी लढण्यात मदत करत होते, ते समजून मला फार समाधान वाटत आहे. तुझी सगळ्या लोकपालांशी व्यक्तिशः भेट झाली हेसुद्धा चांगले झाले. ह्या सगळ्या गोष्टींचा अर्थ असा किं, आपले भविष्य चांगले आहे. तू परत आला आहेस आमच्यात ते माझ्या दृष्टीने विशेष महत्वाचे आहे. मला असें वाटू लागले आहे कीं, सगळी धरती आपण आधीच जिंकली आहे. धृतराष्ट्राची मुलं आधीच हरली आहेत असे मी समजतो. एवढे बोलल्यानंतर तो राजा अर्जुनाला विचारतो कीं, त्याला ती अद्भूत आयुध पहावयाची आहेत. त्यासाठी सगळे पांडव

उत्सुक आहेत. ज्या शस्त्रांने त्यांने निवात कवचांचा नाश केला ती दाखव असे तो त्याला सांगतो. अर्जुन त्याला सांगतो उद्या सकाळी मी तुम्हाला ती सगळी शस्त्र दाखवणार आहे. जी वापरून मी हिरण्यपुर व निवात कवचांचा नाश केला. त्यानंतर तो त्याच्या इतर भावंडाच्या सह झोपला.

अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा एकोणीसावा भाग संपला.

# निवात कवच युद्ध पर्व

## (भाग विसावा )

वैशंपायन पुढे सांगत असतात, ती रात्र संपल्यानंतर दुसर्या दिवशी युधिष्ठीर त्याच्या भावंडासह उठला. प्रातःकाळचे सगळे विधी उरकले, मग ते सगळे भाऊ पुन्हा एकत्र आले तेव्हां तो अर्जुनाला बोलतो, "अरे कौंतेया, आता तू आम्हाला ती आयुध दाखव ज्यांच्या वापराने तू ती राक्षसांची दोन नगरं पादाक्रांत केलीस". तशी आज्ञा झाल्यानंतर तो पावित्र्याचा पुतळा धनंजय त्याची ती सगळी आयुध त्याच्या भावंडाना दाखवतो. रथात बसल्यासारखा तो जमिनीवर बसून आजुबाजूच्या गोष्टींचा आधार घेऊन ती शस्त्र कशी वापरतात त्याचे प्रात्यक्षिक सुद्धा त्यांना दाखवतो. त्यात इंद्राने दिलेला शंखू तो दाखवतो. जसें तो ती शस्त्रं वापरासाठी सज्ज करतो, सगळी पृथ्वी हादरू लागते. त्याचा त्रास होऊ लागतो. त्या शस्त्रांचे बळ वाढू लागले तसा सूर्याचे तेज कमी झाल्याचे जाणवले. अग्नी मंद झाला, वेदांचे महत्व सुद्धा कमी झाले.

पुढे वैशंपायन जनमेजयाला सांगतात, पृथ्वीत बिळांत रहाणारे जीव गुदमरल्यासारखे पटापट बाहेर येऊ लागले. ते पांडवांच्या आवतीभोवती जमा झाले. हात जोडून ते विनवणी करू लागले किं, हे थांबवा. त्या आयुधांच्या तापानें भाजले गेल्याने ते अर्जुनाला पुनः पुन्हा विनवणी करू लागले. त्यानंतर ब्रह्मर्षी, महर्षी व सिद्ध तेथे दिसू लागले. त्यानतर देवर्षी व यक्ष, राक्षस, गंधर्व आणि गरूड वर्गातील प्रजाती तेथे दिसू लागल्या. त्यानंतर सगळे लोकपाल व साक्षात महादेव सुद्धा त्यांना तेथे दिसू लागले. त्यांच्या बरोबर त्यांचे असंख्य गणसुद्धा उपस्थित झाले होते. अरे राजा जनमेजया, तेथे दैवी फुलं बहरलेल्या स्थितीत त्यांना दिसू लागली. वायूदेवांने ते पृथ्वीवर पसरून टाकले. स्वर्गातून गंधर्व आले व स्तुती सुमनं गाऊ लागले. अहो रजे जनमेजय, तेथे अप्सरासुद्धा त्यांना दिसू लागल्या. त्या नृत्य करत होत्या. केवळ ती शस्त्रे बाहेर काढल्याने ते झाले होते, अजून वापर होण्याचे बाकी होते. नंतर अर्जुन त्या पांडवाना सांगतो, हि आयुध खरेतर अशाप्रकारे उघडावयाची नसतात. म्हणून मी ती आता बंद करत आहे. जेव्हां युद्ध होते तेव्हां त्या गरजेनुसार ती बाहेर काढावयाची असतात. मी तुमच्या समाधाना साठी ती काढली पण ते

अयोग्य आहे म्हणून मी ती पुन्हा बंद करून ठेवत आहे. जेव्हां कौरवांशी लढाई होईल तेव्हां ती मी योग्यरित्या बाहेर काढणार आहे. ह्या आयुधांशी खेळणे फार घातक असते. युधिष्ठीर ते समजल्यावर अर्जुनाला सांगतो कीं, तसे असेल तर ती त्वरित बंद करून ठेव, त्याला माहित नव्हते त्याबद्दल म्हणून दाखवायला सांगितले. असें बोलून तो ती आयुध बंद करून ठेवण्यास सांगतो. जेव्हां तू त्यांचा उपयोग युद्धात करशिल तेव्हां तुला समजेल ते कशी काम करतात. वैशंपायन पुढे सांगतात, देवांनी अर्जुनाला ती आयुध न उघडण्याचे सांगून ते लोकपाल, महादेव, गंधर्व, अप्सरा, राक्षस, यक्ष, सिद्ध असें सगळे पुनः अंतर्धान पावतात. त्यामुळें पांडवांना त्या आयुधाच्या सामर्थ्याची कल्पना येते. त्यानंतर तो सगळे सहाजण त्या अरण्यात मजेत राहू लागतात.

अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा विसावा भाग संपला.

# निवात कवच युद्ध पर्व संपले

## (भाग एकविसावा )

जनमेजय सांगत असतात, मला सांगा तो पार्थ स्वर्गातून ती सगळी आयुध मिळवून परत आल्यावर माझे पूर्वज धनंजयाबरोबर कसे रहात होते.

वैशंपायन सांगू लागतात, आपल्या इंद्रा सारख्या संपन्न भावाबरोबर, अर्जुना बरोबर ते तेथील गंधमादन पर्वतातील सुंदर उपवनात मजा करत असतात. त्यांचा समय सुखात जात होता. त्या प्रदेशांचे निरीक्षण करण्यात त्यांचा काळ सुखात जात होता. किर्ती त्याच्या हातात धनुष्य व बाण घेऊनच फिरत असें. वैश्रावणाच्या कृपेने त्यांना तेथे मजेत रहाण्याची सोय होती त्यामुळें ते कशाचीही पर्वा न करता आपला काळ आनंदात घालवत होते. अशारितीने ते नंतरची चार वर्षे तेथे अर्जुनाच्या संगतीत रहात होते. तो काळ कसा गेला तेसुद्धा त्यांना समजले नाही. पांडवांच्या आयुष्यातील तो सगळ्यात जास्त सुखाचा काळ होता. पांडव व त्यांच्या बरोबर असलेले असें सगळे दहाजण एकदा एकत्र बसून कांहीं निर्णय घेण्याचे ठरवतात. त्यात भिम अर्जुन त्यांची पत्नी कृष्णा व दोघे माद्रीचे असें बसलेले होते. ते त्यांच्या राजाला विनंती करतात कीं, आपल्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी आपल्याला येथे जंगलात रहाणे योग्य नाही. आपण गेली अकरा वर्षे असें रहात आहोत. येथील सुखात रमण्यासाठी आपला जन्म झालेली नाही. आपल्याला आता अज्ञातवासात जावयाचे आहे म्हणजे आपल्या बरोबर असलेल्यांचा सुद्धा आपल्याला आता त्याग करावा लागणार आहे. येथे राहून आपल्याला आपला गेलेला मान सन्मान मिळणार नाही. आपल्या शंत्रूंना माहित आहे आपण आज कोठे आहोत. त्यासाठी पुढील वर्षासाठी येथून जाणे गरजेचे आहे. अशारितीने यशस्वीरीत्या अज्ञातवासात राहिल्यानंतर आपल्याला पुढचे काम करावयाचे आहे ज्या साठी जिश्नु स्वर्गात गेला होता. आपल्या बरोबर असलेल्या सोबत्यांना सुद्धा आपल्याला आता सोडावे लागेल व ते त्यांच्या ठिकाणी जातील. ते गेल्यानंतर आपण येथून निघावयाचे आहे. अज्ञातवासात यशस्वीपणे राहिल्यावर आपण त्या कौरवांचा नाश करावयाचा आहे, त्यासाठी हा अज्ञातवासातील काळ यशस्विपणे काढणे जरुरीचे आहे. येथे असे रहाण्याने आपण आपली दुःखं कदाचित

विसरू व आपला वचपा काढण्याचा विचारसुद्धा कमजोर होईल ते योग्य नाही. म्हणून येथून निघणे आवश्यक आहे असें त्यातील एक जण बोलतो जे इतरांना पटते. ते आपले गेलेले राज्य मिळवून तू आमचा राजा उत्कर्षाला पोहोचेल जे आपले उद्दिष्ट आहे. तुला विविध यज्ञ करावयाचे आहेत. त्यासाठी तू आता तुझ्या शत्रूच्या नाशाचा विचार करण्यास सुरूवात करावीस. तेथे आपला मामेभाऊ दामोदर आपला वाट पहात आहे. सत्यकीसुद्धा आपली वाट पहात आहे. म्हणून अरे धर्मराजा युधिष्ठीरा, अर्जुनाच्या व भिमाच्या अद्वितीय सामर्थ्याचा उपयोग करून तू, कृष्ण त्याचे यादव, तुझे दोन धाकटे भाऊ, आणि इतर अनेक राजे ह्यांच्या मदतीने युद्धाची तयारी करावयाचा विचार करावास असें ठरते. ते धर्मयुद्ध घडवणे व त्यात कामयाब होणे हे उद्दीष्ट पुढे ठेवून आपल्या योजना तयार करावयाला सुरूवात केली पाहिजे.

एवढे बोलल्यानंतर वैशंपायन सांगतात, असे त्यांचे विचार ऐकल्यावर तो राजा, कृपा दयाळू धर्मराज युधिष्ठीर हित व न्याय ह्यांचा विचार करून कांहीं ठरवतो. तो वैश्रावणाच्या वाड्याकडे जातो. त्या वाड्याला तेथील हरएक गोष्टीचे आभार मानत तेथे असलेल्या राक्षसांचा निरोप घेत, तेथील पर्वतांचे सुद्धा कृपाप्रसाद मांगतो व त्या सगळ्यांना लवून नमस्कार करत तेथून निघतो. त्यावेळी तो त्या गंधमादन पर्वताला आश्वासन देतो कीं, आम्ही आमचे उद्दीष्ट साध्य केल्यानंतर पुनः येथे तुला भेटण्यास येणार आहोत. त्यानंतर येथे राहून घोर तपस्या करत रहाणार आहोत तुझ्या सानिध्यात. ते झाल्यावर ते पांडव त्यांच्या बरोबर असलेल्या ब्राह्मणांसह तेथून निघतात. भिमाच्या आवाहनाने त्याचा राक्षस पुत्र घटोत्कच तेथे त्याचे राक्षस सोबती घेऊन येतो व त्यांच्या मदतीने त्या तीर्थयात्रींचा परतीचा प्रवास, आले त्याच मार्गाने, ते प्रारंभ करतात. त्यांना निरोप देण्यासाठी ऋषी लोमस, अर्ष्टीसेन ऋषी त्यांना निरोप देतात. पांडव त्यांच्या परतीच्या प्रवासात आणखीन कांहीं अद्भूत तीर्थक्षेत्रे पहात आपला परतीचा प्रवास करू लागतात.

अशारितीने निवात कवच युद्ध पर्वाचा बाविसावा भाग संपला.

## – महाभारत बारावा खंड संपला –

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

**ई साहित्य प्रतिष्ठान -**

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप

ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मागवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद